


मराठा सेवा संघ प्रणीत

# अहमदनगर जिल्हा मराठा सेवा नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, अहमदनगर


रजि.नं.एएनआर/आरएसआर/सीआर/२८९७/२००० दि. २५/१०/२०००

**अहमदनगर जिल्हा मराठा सेवा नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, अहमदनगर**

मराठा सांस्कृतिक भवन, जिजाऊ मार्ग, बारातोटी कारंजा, अहमदनगर. फोन : (०२४१) २३५४९०७


जा. क्र. अ.जि.म.से.ना.सह. पतसंस्था/ अधिमंडळाची बैठक / ९५ /२०२४ — दि. १४/०९/२०२४

## अधिमंडळाच्या वार्षिक बैठकीचे सूचनापत्र
**(फक्त सभासदांकरिता)**

अहमदनगर जिल्हा मराठा सेवा नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, अहमदनगर या संस्थेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, संस्थेची २४ वी अधिमंडळाची वार्षिक बैठक **रविवार, दि. २९ सप्टेंबर २०२४ रोजी दुपारी २:०० वाजता कोहिनूर मंगल कार्यालय, पारिजात चौक, गुलमोहर रोड, सावेडी, अहमदनगर येथे संस्थापक अध्यक्ष, चेअरमन शिवश्री इंजि. विजयकुमार गोविंदराव ठुबे** यांच्या अध्यक्षतेखाली खालील विषयांच्या कामकाजाकरिता आयोजित केली आहे. कृपया सर्व सभासदांनी बैठकीस उपस्थित राहावे, ही विनंती.

## बैठकीपुढील विषय

१. दि. २३ सप्टेंबर २०२३ रोजी झालेल्या अधिमंडळाच्या बैठकीचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२. सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षाच्या वैधानिक लेखापरीक्षण झालेल्या ताळेबंद व नफा-तोटा पत्रकावर विचार करणे व स्वीकृत करणे.
३. वैधानिक लेखापरीक्षकांच्या लेखापरीक्षण अहवालावर विचार करणे व स्वीकृत करणे.
४. संचालक मंडळाने शिफारस केलेल्या नफा वाटणीस मंजुरी देणे व लाभांश जाहीर करणे.
५. पुढील वर्षाच्या अंदाजपत्रकाची आणि गतवर्षीच्या अंदाजपत्रकातील खर्चाची माहिती देणे आणि मान्यता घेणे.
६. संचालक मंडळ सदस्य व त्यांचे नातेवाईकांना दिलेल्या कर्जाबाबत माहिती घेणे.
७. सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षाच्या लेखापरीक्षणासाठी वैधानिक लेखापरीक्षकाची नेमणूक करणे.
८. संस्थेची संगणक प्रणाली अद्ययावत करणेबाबत विचारविनिमय करणे.
९. संस्थेच्या नेवासा येथील जागेबाबत विचारविनिमय करणे.
१०. महाराष्ट्र शासनाच्या नागरी/ग्रामीण बिगर कृषी सहकारी पतसंस्थेसाठी एकरकमी कर्ज परतफेड योजना अंतर्गत तडजोड केलेल्या थकीत कर्ज खात्याची माहिती देणे .
११. सन २०२२-२०२३ मधील वैधानिक लेखापरीक्षण दोष दुरुस्ती अहवालाची नोंद घेणे.
१२. मा. अध्यक्षांच्या पूर्वपरवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयांवर चर्चा करणे.

मा. संचालक मंडळाच्या आदेशावरून
अशोक बापूराव वारकड
मुख्य कार्यकारी अधिकारी
अहमदनगर जिल्हा मराठा सेवा नागरी
सहकारी पतसंस्था मर्यादित, अहमदनगर

**स्थळ : अहमदनगर**
दिनांक : १४/०९/२०२४

**टीप :**

१) कोरमअभावी बैठक तहकूब झाल्यास, त्याच ठिकाणी अर्धा तास थांबून बैठकीचे कामकाज सुरू करण्यात येईल. तहकूब झालेल्या बैठकीस कोरमची आवश्यकता असणार नाही.
२) सभासदांना अधिमंडळाच्या वार्षिक बैठकीपुढे असलेल्या विषयासंबंधी माहिती पाहिजे असल्यास, तसेच काही प्रश्न अगर सूचना द्यावयाच्या असल्यास दि. २५/०९/२०२४ पर्यंत संस्थेच्या मुख्य कार्यालयात लेखी स्वरूपात द्याव्यात.
३) सभासद शिक्षण कार्यक्रम बैठकीच्या ठिकाणी दुपारी १:३० वाजता आयोजित केला आहे.
४) गुणगौरव समारंभ बैठकीच्या ठिकाणी सकाळी ११:०० वा. आयोजित केला आहे.






# ❊ भावपूर्ण आदरांजली... ❊

अहवाल सालात जे थोर स्वातंत्र्यसेनानी, भारतीय व जागतिक कीर्तीचे शास्त्रज्ञ, थोर साहित्यिक, कलावंत, राजकीय, सामाजिक व सहकारी चळवळीतील कार्यकर्ते, शिक्षणतज्ज्ञ, सेनादलातील सैनिक, तसेच आपल्या संस्थेचे सभासद, ठेवीदार, हितचिंतक दिवंगत झालेत, त्यांच्या स्मृतीस आम्ही आदरपूर्वक अभिवादन करून त्यांना कृतज्ञतापूर्वक भावपूर्ण आदरांजली अर्पण करीत आहोत.

**चेअरमन, व्हा. चेअरमन, संचालक मंडळ, सल्लागार मंडळ, सभासद व कर्मचारी वृंद.**

## ❊ गुणगौरव समारंभ ❊

मराठा समाजातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य केलेले समाजबांधव व भगिनी, तसेच शैक्षणिक, सांस्कृतिक, कला, क्रीडा व विविध क्षेत्रांत विशेष प्रावीण्यप्राप्त गुणवंत विद्यार्थी, विद्यार्थिनी व गुणवंतांचा मराठा सेवा संघ व मराठा सेवा नागरी सहकारी पतसंस्था मर्या., अहमदनगर यांच्या वतीने मान्यवरांच्या शुभहस्ते गुणगौरव समारंभ **रविवार दि. २९ सप्टेंबर २०२४ रोजी सकाळी ११:०० वाजता कोहिनूर मंगल कार्यालय, सावेडी, अहमदनगर येथे आयोजित केलेला आहे.** तरी सर्व समाजबांधवांनी या समारंभास उपस्थित राहावे.

या समारंभासाठी विविध क्षेत्रांत विशेष प्रावीण्य मिळविलेले समाजबांधव, तसेच एस.एस.सी. (दहावी) परीक्षेत ७५ टक्क्यांपेक्षा जास्त व एच.एस. सी.(बारावी) परीक्षेत ७० टक्क्यांपेक्षा जास्त गुण मिळवलेले विद्यार्थी व विद्यार्थिनी, प्रज्ञाशोध परीक्षा, शासकीय शिष्यवृत्ती परीक्षा, एम. पी. एस. सी., यू. पी. एस. सी., मेडिकल, इंजिनिअरिंग व विविध परीक्षांमध्ये विशेष प्रावीण्य मिळवलेले विद्यार्थी, विद्यार्थिनी त्याचप्रमाणे सर्व शाखांचे पदवी व पदव्युत्तर परीक्षा शेकडा ६० टक्क्यांपेक्षा जास्त गुणांनी उत्तीर्ण झालेले विद्यार्थी व विद्यार्थिनी, तसेच कला, क्रीडा, साहित्य, सांस्कृतिक क्षेत्रांत जिल्हा, राष्ट्रीय व राज्य पातळीवर प्रावीण्य मिळविलेले विद्यार्थी व विद्यार्थिनींनी किंवा त्यांच्या पालकांनी अधिकृत प्रमाणपत्र व गुणपत्रिकाच्या छायांकित प्रतीसह तसेच स्वतःचा पत्ता व **फोन नंबरसह दि.२५ सप्टेंबर २०२४ पर्यंत मराठा पतसंस्थेच्या व्हॉटसॲप नंबरवर अथवा मुख्य कार्यालयात पाठवावी.**

**Whatsapp No. 7768012484**

| | | |
|---|---|---|
| **इंजि.विजयकुमार ठुबे** | **पत्रकार किशोर मरकड** | **इंजि.सुरेश इथापे** |
| संस्थापक अध्यक्ष, चेअरमन | व्हा.चेअरमन | जिल्हाध्यक्ष, मराठा सेवा संघ, अ.नगर |

## सभासदांना नम्र आवाहन

आपण आपल्या संस्थेचे सन्माननीय सभासद आहात. संस्थेच्या कामकाजाबाबतची विस्तृत माहिती आपणाकडे दरवर्षी येत असलेल्या वार्षिक अहवालातून मिळत असतेच. संस्थेची आर्थिक स्थिती सक्षम असल्यामुळे संस्था स्थापन झाल्यापासून सर्व सभासदांना लाभांश देतच आहे. म्हणजे गेली २३ वर्षे ७% ते १०% दराने आजपर्यंत कमाल १६६% परतावा लाभांश रूपाने आपणांस दिलेला आहे. उदा. जर आपला रू. १०००/- चा भाग / शेअर्स असेल तर त्यावर आजपर्यंत कमाल १६६०/- एवढा परतावा लाभांशाच्या रूपाने आपणास मिळलेला आहे. संस्थेच्या आर्थिक भक्कमतेच्या जोरावर भविष्यात १५% लाभांश देण्याचा मानस मा. संचालक मंडळाचा आहे आणि तो आम्ही निश्चितच पूर्ण करू. संस्थेच्या असणाऱ्या भक्कम आर्थिक स्थितीचा विचार करतांना शासनाने खास बाब म्हणून आपल्या संस्थेस रू. ५ लाखापर्यंत सभासदांना भाग/शेअर्स धारण करण्यास मंजुरी दिलेली आहे. याचा विशेष उल्लेख करावासा वाटतो.

याच योजनेचा भाग म्हणून संस्थेच्या मा. संचालक मंडळ यांनी **सभासद संपर्क अभियानाच्या** माध्यमातून संस्थेच्या वसूल भाग भांडवलामध्ये वाढ करण्याची अभियान आखलेले आहे. तरी प्रत्येक सभासदांनी आपल्या असलेल्या भागामध्ये/शेअर्समध्ये किमान रू. १०००/- चे ज्यादा भागभांडवल घ्यावे असे आवाहन या निमित्ताने आपणास करित आहोत. विशेष बाब म्हणजे आपण संस्थेचे सभासद असल्याने आपणांस मिळणाऱ्या लाभांशावर आयकरामध्ये देखील सवलत आहे. तरी या योजनेस प्रतिसाद देऊन आतापर्यंत संस्थेस दिलेले सहकार्य यापुढे ही असे वृद्धींगत करावे.

# सल्लागार मंडळ

❊ **मुख्य कार्यालय –** शिवश्री सुरेश कोंडीराम इथापे (जिल्हाध्यक्ष, मराठा सेवा संघ), शिवश्री राजेश गणपत परकाळे (जिल्हाध्यक्ष, संभाजी ब्रिगेड), शिवमती संपूर्णा किसन सावंत (जिल्हाध्यक्षा, जिजाऊ ब्रिगेड ), शिवश्री प्रा. खासेराव हणुमंत शितोळे, शिवश्री प्रा.पोपटराव मारुती काळे, शिवश्री निवृत्ती माधवराव कोल्हे, शिवश्री डॉ. शरद गोविंदराव ठुबे, शिवश्री राजेंद्र मारुती ससे, शिवश्री मच्छिंद्र मल्हारी तांबे, शिवश्री राधाकृष्ण वाळुंज, शिवश्री रवींद्र सुधाकर देशमुख, शिवश्री सुदाम लक्ष्मण मडके, शिवश्री ज्ञानदेव निवृत्ती रोहकले, शिवश्री शामराव नामदेव कुलट, शिवश्री अशोक पांडुरंग कुटे, शिवश्री प्रशांत सुरेश नेटके. उद्योजक शिवश्री नवनाथ धुमाळ, शिवश्री प्रा.एल.बी.म्हस्के, सी.ए.राजेश काळे

❊ **मार्केटयार्ड, अहमदनगर शाखा** – शिवश्री तारकराम सीताराम झावरे, शिवश्री विनायक कृष्णाजी गरड, शिवश्री दत्तात्रय किसन ठुबे, शिवश्री चंद्रकांत मुळे, शिवश्री धर्मेंद्र दशरथ गीते, शिवश्री अतुल बाबुराव लहारे, शिवश्री दत्ता साठे, शिवश्री गोवर्धन पांडुळे, शिवश्री यशवंत धोंडीराम कदम, शिवश्री दौलत उत्तम मुठे, शिवश्री अमित धामणे

❊ **भिंगार शाखा** – शिवश्री कानिफनाथ नामदेव कासार, शिवश्री अर्जुनराव रामभाऊ बेरड, शिवश्री कैलास गंगाधर मोहिते, शिवश्री संजय माधवराव सपकाळ, शिवश्री शिवाजीराव बेरड, शिवश्री शांताराम मच्छिंद्र वाघस्कर, शिवश्री अनिल भागचंद तनपुरे, शिवश्री मळू धर्मराज औटी, शिवश्री शामराव देवीदास वाघस्कर, शिवश्री कोंडीराम वाघस्कर, शिवश्री कैलास वाघस्कर, शिवश्री राजेंद्र कडूस, शिवश्री गणेश शिंदे, शिवश्री गणेश शिंदे

❊ **संगमनेर शाखा** – शिवश्री डॉ. माणिक पंढरीनाथ शेवाळे, शिवश्री चंद्रभान शंकर नवले, शिवश्री गवराम विठोबा रहाणे, शिवश्री काशीनाथ नामदेव हांडे, शिवश्री बाळासाहेब जगन्नाथ आमटे, शिवश्री भास्कर दशरथ खताळ, शिवश्री प्रकाश संपत रहाणे, शिवश्री शांताराम माधव घुले, शिवश्री प्रवीण अरूण कानवडे, शिवमती मथुराबाई बिभिषण भोसले, शिवमती संगीता वसंतराव गायकवाड, शिवमती संजना संदीप शेळके.

❊ **नेवासा शाखा –** शिवश्री परशुराम मोहनीराज मते, शिवश्री रावसाहेब सदाशिव घुमरे, शिवश्री राजेश दत्तात्रय जगताप, शिवश्री रघुनाथ किसन आगळे, शिवश्री त्र्यंबक काशीनाथ सुकाळकर, शिवश्री अशोक मोहन साळुंके, शिवश्री ॲड. अनंत बाळकृष्ण दरंदले, शिवश्री बाळासाहेब बाबुराव देवखिळे, शिवश्री किशोर श्रीपती भणगे, शिवश्री पी.आर. जाधव, शिवश्री सूर्यकांत साहेबराव गव्हाणे, शिवश्री महेश विष्णू निपुंगे, शिवश्री मुरलीधर देवराव मते, शिवश्री जनार्धन नाथू हारदे, शिवमती शारदा रघुनाथ वांढेकर, शिवश्री मुरलीधर नामदेव कराळे, शिवश्री चंद्रकांत नारायण काळे, शिवश्री बबन कचरू पवार.

❊ **पाथर्डी शाखा –** शिवश्री नामदेव सदाशिव लबडे, शिवश्री बबनराव नानासाहेब जेधे, शिवश्री बापुसाहेब बबनराव कल्हापुरे, शिवश्री डॉ. बाळकृष्ण देवराम मरकड, शिवश्री योगेश सोपानराव वाकचौरे, शिवश्री प्रशांत विक्रम शेळके, शिवश्री सर्जेराव धोंडीराम काकडे, शिवश्री. सूर्यकांत दत्तू बोरूडे, शिवश्री विजय शेषराव चितळे, शिवश्री ॲड. चंद्रकांत नामदेव सातपुते, शिवश्री डॉ. राहुल शिवाजी देशमुख, शिवश्री पुरूषोत्तम राम कचरे, शिवश्री रवींद्र नामदेवराव मरकड, शिवश्री बाळकृष्ण आसाराम शेळके, शिवश्री चंद्रकांत बापुराव भापकर, शिवश्री बाळासाहेब कोकाटे, शिवमती शोभना पांडुरंग काकडे, शिवश्री प्रकाश बाळनाथ धस

❊ **शेवगांव शाखा–** शिवश्री विजय भास्करराव देशमुख, शिवश्री शिवाजीराव अंबादास देवढे, शिवश्री विक्रमराव रावसाहेब दारकुंडे, शिवश्री राजेंद्र पोपटराव झरेकर, शिवश्री प्रमोद नारायण बोडखे, शिवश्री निलेश प्रमोद बोडखे, शिवश्री सतीश जगतराव मरकड

❊ **कायदेशीर सल्लागार –** ॲड. माणिकराव मोरे, ॲड. शेखर दरंदले, ॲड. रवींद्र शितोळे, ॲड. विलास गरड, ॲड. भगवंत काळे,ॲड. संदीप खांदवे, ॲड. प्रदीप कर्डिले, ॲड. शिवाजी कराळे, ॲड. शिल्पा बेरड, ॲड. अनुराधा येवले, ॲड. कृष्णा झावरे, ॲड. अशोक गुंडपाटील, ॲड. नितीन काळे, ॲड. नितीन अडसुरे, ॲड. दादाभाऊ वर्पे, ॲड. प्रियंका औटी, ॲड. मधुकर भांगरे, ॲड. साहेबराव चौधरी, ॲड. कृष्णा मोटे, ॲड. गौरव दांगट, ॲड. सुरेश लगड, ॲड. राजाभाऊ शिर्के ॲड. विजय गवांदे. **उच्च न्यायालय –** ॲड. शिवाजी शेळके, ॲड. नितीन गवारे, ॲड. अभिजीत मोरे, ॲड. दत्ता नागोडे

❊ **गोल्ड व्हॅल्युअर माळीवाडा व मार्केटयार्ड शाखा –** प्रियांक बेल्हेकर, **भिंगार शाखा** – अशोक अंबिलवादे, **नेवासा शाखा** – विजय दहीवाळकर, **पाथर्डी शाखा**– अरविंद जोजारे, **संगमनेर शाखा** – महेश मयूर **शेवगांव –** राजेंद्र पंडित

❊ **प्रॉपर्टी व्हॅल्युअर –** इंजि.आबासाहेब कर्डिले, इंजि. डी.ई. भगत, इंजि. मनिष गुळवे, इंजि. बाळासाहेब भिसे.






## * संचालक मंडळ *

| | | |
|---|---|---|
| १ | शिवश्री इंजि. विजयकुमार गोविंदराव ठुबे (B.E. Civil, M.Sc.) | संस्थापक अध्यक्ष, चेअरमन |
| २ | शिवश्री पत्रकार किशोर मोहनराव मरकड (B.Com., B.C.J.) | व्हा.चेअरमन |
| ३ | शिवश्री लक्ष्मणराव भानुदास सोनाळे (B.A) | संचालक |
| ४ | शिवश्री ज्ञानदेव दत्तात्रय पांडुळे (B.A) | संचालक |
| ५ | शिवमती राजश्री रवींद्र शितोळे (B.A.,L.LB. (II) ) | संचालिका |
| ६ | शिवश्री सतीश शंकरराव इंगळे (M.Com.) | संचालक |
| ७ | शिवश्री बाळकृष्ण मारुती काळे (B.Com.) | संचालक |
| ८ | शिवश्री प्रा. किसन सखाराम पायमोडे M.A.(I), DHE (I) | संचालक |
| ९ | शिवश्री यशवंत(कालिदास) जयवंतराव शिंदे (D.Pharm.) | संचालक |
| १० | शिवश्री ॲड. काशिनाथ कुंडलिक डोंगरे (M.Com., GDC&A,LLB) | संचालक |
| ११ | शिवश्री ज्ञानेश्वर (उदय) भाऊसाहेब अनभुले (B.Com., M.S.W) | संचालक |
| १२ | शिवश्री इंजि.संभाजी मोहनीराज मते (सेवानिवृत्त कनिष्ठ अभियंता पाटबंधारे विभाग) | संचालक |
| १३ | शिवश्री द्वारकाधीश उत्तमराव राजेभोसले (B.Com.,M.B.A.) | संचालक |
| १४ | शिवश्री इंजि. बाळासाहेब दशरथ सोनाळे D.(E&T/C)E | संचालक |
| १५ | शिवमती डॉ. कल्पना शरद ठुबे (M.D. Homoeopathy) | संचालिका |
| १६ | शिवश्री ॲड. राजेश दत्तात्रय कावरे (B.A. L.L.B.) | संचालक |
| १७ | शिवश्री राजेंद्र नामदेव ढोणे (B.A.D.C.M.) | तज्ज्ञ संचालक |
| १८ | शिवश्री अच्युत रामचंद्र गाडे (B.A.) | तज्ज्ञ संचालक |






## कर्मचारी वृंद

| | | |
|---|---|---|
| १ | शिवश्री अशोक बापुराव वारकड (B.A., B.Com., G.D.C. & A.) | मुख्य कार्यकारी अधिकारी |
| २ | शिवश्री बबन बाबुराव सुपेकर B.Com., G.D.C.&A. | सह. व्यवस्थापक |
| ३ | शिवश्री गोरख रामदास काटे M.A. | वसुली अधिकारी |
| ४ | शिवश्री अशोक रामनाथ अरगडे B.Com., G.D.C.&A. | शाखाधिकारी – संगमनेर शाखा |
| ५ | शिवमती अनुपमा बापुसाहेब भापकर B.A., D.C.M. | शाखाधिकारी – मार्केटयार्ड शाखा |
| ६ | शिवश्री प्रितेश रेवन्नाथ बोरुडे B.A., D.C.M. | शाखाधिकारी – भिंगार शाखा |
| ७ | शिवश्री महेशकुमार आसाराम नलवडे M.Sc., G.D.C.& A. | शाखाधिकारी – शेवगाव शाखा |
| ८ | शिवमती पुष्पा विनायक इंगळे M.A.,B.Ed. | शाखाधिकारी – माळीवाडा शाखा |
| ९ | शिवश्री संतोष रघुनाथ पारखे M.A., M.Ed. | प्र. शाखाधिकारी – नेवासा शाखा |
| १० | शिवश्री गणेश विष्णू खोर्दे B.A. | प्र. शाखाधिकारी – पाथर्डी शाखा |
| ११ | शिवमती कांता संजय जाधव B.Com., G.D.C.&A. | प्र. शाखाधिकारी – कर्जत शाखा |
| १२ | शिवश्री रणजित हरिभाऊ रकटाटे M.Com., G.D.C.&A. | लेखाधिकारी – माळीवाडा शाखा |
| १३ | शिवमती कविता राजेंद्र ढोणे D.Ed., B.A. (Appeared) | कनिष्ठ लिपिक – माळीवाडा शाखा |
| १४ | शिवश्री सूर्यकांत मारुती कडू B.Sc. G.D.C.&A. | कनिष्ठ लिपिक – नेवासा शाखा |
| १५ | शिवमती दीपमाला नीलेश पवार M.Com. | कनिष्ठ लिपिक – भिंगार शाखा |
| १६ | शिवश्री प्रभाकर बबनराव जेधे B.A. B.Ed. | कनिष्ठ लिपिक – पाथर्डी शाखा |
| १७ | शिवश्री दिलीप संपत खर्डे B.A. (Appeared) | कनिष्ठ लिपिक – संगमनेर शाखा |
| १८ | शिवमती मंजुश्री राजेश गुंजाळ B.Com. | कनिष्ठ लिपिक – संगमनेर शाखा |
| १९ | शिवश्री प्रशांत महादेव बोरुडे H.S.C. | कनिष्ठ लिपिक – मार्केट यार्ड शाखा |
| २० | शिवमती रोहिणी रावसाहेब मुळे M.Sc.,B.Ed. | कनिष्ठ लिपिक – शेवगाव शाखा |
| २१ | शिवश्री शुभम सुरेश केसभट Bcs. | कनिष्ठ लिपिक – शेवगाव शाखा |
| २२ | शिवश्री रोहन सखाराम सातपुते B.A. | कनिष्ठ लिपिक – पाथर्डी शाखा |
| २३ | शिवश्री नीलेश विष्णू जाधव B.A., (Appeared) | सहाय्यक – नेवासा शाखा |
| २४ | शिवश्री शशिकांत गुलाब बोरुडे S.S.C. | सहाय्यक – भिंगार शाखा |
| २५ | शिवश्री तेजस हेमंत कासार B.Com. | सहाय्यक – माळीवाडा शाखा |
| २६ | शिवश्री मनेश दिलीप रोहोकले S.S.C. | सहाय्यक – मार्केटयार्ड शाखा |
| २७ | शिवश्री अक्षय तान्हाजी डोंगरे H.S.C. | सहाय्यक – संगमनेर शाखा |

 



# २४ वा वार्षिक अहवाल २०23-२४

सन्माननीय सभासद बंधु भगिनींनो,

आदरपूर्वक जय जिजाऊ !!

आपल्या 'मराठा पतसंस्थेच्या' चोवीसाव्या अधिमंडळाच्या बैठकीमध्ये आपल्या सर्वांचे मनःपूर्वक हार्दिक स्वागत ! आपल्या पतसंस्थेने मागील वर्षापूर्वीची दोन-तीन वर्षे अतिशय कठीण परिस्थितीला तोंड देत आपली नैतिकता कायम ठेवत प्रगती चालू ठेवली. मागील वर्षी सर्व सभासदांनी बहुमताने आमच्या पॅनलवर विश्वास ठेवून संपूर्ण पॅनलला निवडून दिले. संपूर्ण पॅनल निवडून आल्यामुळे आता आमची म्हणजे विद्यमान संचालक मंडळाची जबाबदारी प्रचंड प्रमाणात वाढली आहे व ती आम्हीपण नम्रपणे स्वीकारली आहे. मागील वर्षात पतसंस्था चळवळीची नैतिक पातळी मोठ्या प्रमाणात घसरली आहे. बऱ्याच चांगल्या पतसंस्था डबघाईला आल्या आहेत. तसेच बुडित निघाल्या आहेत, काही पतसंस्थांचे संचालक मंडळ अडचणीत आले आहेत, त्या पार्श्वभूमीवर सध्या नागरिकांमध्ये पतसंस्थांच्याबाबत अविश्वास निर्माण झाला आहे. त्यामुळे पतसंस्थांमध्ये ठेवी ठेवण्याबाबत नागरिक साशंक झाले आहेत. या पार्श्वभूमीवर आपले संचालक मंडळ तसेच अधिकारी व कर्मचारी वृंद अधिक सतर्क झाले आहे. वर नमूद केल्याप्रमाणे सर्व मानवनिर्मित चढउतारांना सामोरे जाऊन आपल्या पतसंस्थेने आपली पत राखून ठेवली व समाजाच्या दृष्टिकोनातून दखलपात्र अशी प्रगतीही केली आहे. त्याचे सर्व श्रेय आजी-माजी संचालक, मुख्य कार्यकारी अधिकारी व त्यांचे सर्व शाखातील सहकारी तसेच संचालक मंडळावर विश्वास ठेवणारे आपण सर्व सभासद, हितचिंतक, सामाजिक भान ठेवणारे सर्व स्तरातील नागरिक तसेच मराठा सेवा संघ, संभाजी ब्रिगेड व जिजाऊ ब्रिगेड यांचे जिल्हा पदाधिकारी व कार्यकर्ते यांना जाते. त्यामुळे संचालक मंडळातर्फे आम्ही सर्व सभासद, हितचिंतक, ठेवीदार, कर्जदार व सर्व कर्मचारी वृंदांचे मोकळ्या मनाने अभिनंदन करतो व त्यांच्याप्रती कृतज्ञताही व्यक्त करतो. आपल्या पतसंस्थेचा दिनांक १ एप्रिल २०२३ ते ३१ मार्च २०२४ अखेर संपलेल्या आर्थिक वर्षाचा अहवाल व हिशेबाची पत्रके संचालक मंडळाच्या वतीने आपल्या सर्वांसमोर सादर करताना आम्हास अतिशय आनंद होत आहे.

मराठा सेवा संघाची स्थापना दि ३१ ऑगस्ट १९९० रोजी अकोले येथे झाल्यानंतर या संघटनेचे कार्य अव्याहतपणे चालू आहे. दरवर्षी '१ सप्टेंबर' हा मराठा सेवा संघाचा 'वर्धापन दिन' म्हणून आपण साजरा करत आहोत. गेली ३४ वर्षे हे समाजकार्य चालू आहे. त्याअंतर्गत असलेल्या अर्थकोष कक्षाच्या कार्यकक्षेमध्ये आपली मराठा पतसंस्था यशस्वी वाटचाल करीत आहे. ज्याला पत नाही,त्याला पत मिळवून देण्याचे कार्य ही पतसंस्था आर्थिक कौशल्य पाहून करीत आहे, असे आम्हास अभिमानाने नमूद करावेसे वाटते. गेल्या २४ वर्षात पतसंस्थेने केलेल्या कामांचा ऊहापोह न करता पतसंस्थेने फक्त व्यवसाय न करता समाजाभिमुख कामे करून अनेक नागरिकांना त्यांच्या स्वतःच्या पायावर उभे केले आहे, अनेक तरूणांना देशात व परदेशात शिक्षण घेण्यासाठी आर्थिक पाठबळ दिले आहे. अनेकांना उद्योजक म्हणूनही ओळख करून दिली आहे, हे मुद्दाम नमूद करावेसे वाटते. अर्थात, याचे सर्व श्रेय मराठा सेवा संघाच्या परिवर्तनवादी चळवळीच्या यशालाच जाते.

गेली दहा वर्षे मराठा समाजासाठी आपले सर्वस्व अर्पण केलेल्या वयोवृध्द व्यक्तीचे कार्य समाजासमोर आणण्यासाठी व त्यांच्याकडून तरूणांना प्रेरणा घ्यावी म्हणून मराठा पतसंस्था व मराठा सेवा संघ, अहमदनगर जिल्हा शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने या वयोवृध्द व्यक्तींना 'जीवनगौरव' हा मानाचा पुरस्कार (स्त्री व पुरूष) देऊन त्यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याचे कर्तव्य

पतसंस्थेचे संचालक मंडळ निरपेक्ष भावनेने पार पाडत आहे. तरूणांना व्यवसायासाठी उत्तेजन म्हणून 'जीवन गौरव' या पुरस्काराबरोबरच 'मराठा युवा पुरस्कार' तरूण उद्योजकास देऊन त्यांच्या पाठीवर थाप मारण्याचे कामही पतसंस्थेने आता सुरू केले आहे. मराठा सेवा संघाच्या अहमदनगर जिल्ह्याचे अध्यक्ष इंजि. सुरेश इथापे, संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष शिवश्री राजेश परकाळे, जिजाऊ ब्रिगेडच्या जिल्हाध्यक्षा शिवमती संपूर्णाताई सावंत यांच्या विशेष सहकार्याने जिजाऊ, सावित्री, दशकोत्सव, शिवजयंती, शिवराज्याभिषेक, छत्रपती संभाजी महाराज जयंती, राजर्षी शाहू जयंती इत्यादी सार्वजनिक उत्सवाचे नियोजन पतसंस्थेच्या माध्यमातून दरवर्षी करण्यात येत आहे. त्याप्रमाणे महापुरुषांचे जयंती व पुण्यतिथी निमित्ताने अभिवादन सोहळे गुणवंतांचे गौरव सोहळे, स्वातंत्र्यदिन, प्रजासत्ताक दिन, मराठा सेवा संघाचा वर्धापन दिन इत्यादी कार्यक्रम विविध क्षेत्रातील अधिकारी व गुणवंत यांच्या प्रमुख उपस्थितीत साजरे करत जनजागृती करण्याचे कार्य पतसंस्थेच्या माध्यमातून केले जाते. याचा संचालक मंडळाला सार्थ अभिमान वाटतो.

सध्या पतसंस्था चळवळ काही प्रमाणात बदनाम झाली असली तरी आपल्या पतसंस्थेबद्दलची सभासदांची आस्था आम्हास अतिशय जवळून जाणवली आहे, त्यामुळे संचालक मंडळही जोमाने कामास लागले आहे. मागील वर्षी आम्ही ठेवींचे रूपये ५० कोटींचे उद्दिष्ट ठेवले होते. तथापी वर नमूद केलेल्या कारणामुळे रूपये ४० कोटीपर्यंत साध्य झाले आहे. मात्र पुढील चार वर्षात हे उद्दिष्ट आम्ही रूपये १०० कोटीपर्यंत नेण्यासाठी बांधील आहोत, हे नम्रपणाने जाहीरही करत आहोत. दैनंदिन बचत ठेवी वाढवून जास्तीत जास्त सभासदांना सक्रीय सहभागामध्ये समाविष्ट करावयाचे आहे. आर्थिक ठेव जशी चांगली होईल तशी स्पर्धात्मक परीक्षेसाठी स्वतंत्र अभ्यासिका उघडणे, अद्यायावत ग्रंथालय उभे करणे, घराघरात पतसंस्थेचे सभासद करणे व समाजाला पतसंस्थेचा लाभ मिळवून देणे, स्वमालकीच्या इमारती उभ्या करणे ही उद्दिष्ट संचालक मंडळाने पुढील चार वर्षासाठी ठेवलेली असून त्या दृष्टिकोनातून पावलेही उचलली आहेत. काळाप्रमाणे आपण आपल्या कामकाजामध्ये बदल करणे आवश्यक आहे, याचा विचार करून या वर्षामध्ये ऑनलाईन कोअर बॅंकिंग प्रणाली घेण्याचा संचालक मंडळाने निर्णय घेतला आहे. यामध्ये सर्व प्रकारच्या ऑनलाईन सुविधा, ऑनलाईन बॅंक व्यवहार, ऑनलाईन ठेवी व त्यांच्या पावत्या, पतसंस्थेचा स्वतंत्र आय.एफ.एस.सी.कोड, ठेवी मुदत संपल्याची सुचना,कर्जदारांना हप्त्याची नोटीस, इत्यादीचा समावेश आहे. या संगणक प्रणाली पतसंस्थेची कार्यक्षमता वाढणार आहे. कारभार संपूर्णपणे पारदर्शक राहणार आहे. या निर्णयास आपण सर्वांनी सहमती द्यावी ही नम्र विनंती.

उदात्त हेतूने वरील उद्दिष्ट साध्य करण्यासाठी या अधिमंडळ बैठकीच्या निमित्ताने आपण व्यवसायाच्या माध्यमातून या समाजकार्याच्या जगन्नाथाच्या रथास आपण कुवतीप्रमाणे तन-मन-धनाने सहकार्य करून हातभार लावावा व समाज प्रती ऋण मानून फकिरी वृत्तीने योगदान देणाऱ्या या मराठा पतसंस्थेच्या सर्वांगीण प्रगतीसाठी आर्थिक सहकार्य करावे, अशी नम्र विनंती करतो. समाजातील सर्व स्तरातील घटकांना प्राधान्याने कर्ज वितरण करताना संस्था जी तत्परता व आस्था दाखवते तीच तत्परता व सकारात्मकता कर्जदाराने वेळेवर कर्जाची परतफेड करताना दाखवावी. त्यामुळे संस्था कमीत-कमी कालावधीमध्ये उद्दिष्टपूर्ती सहज साध्य करेल व कमतरता राहणार नाही, अशी आम्हास पूर्ण खात्री आहे. संपूर्ण संचालक मंडळ व निष्ठेने काम करणारे अधिकारी व कर्मचारी सदैव शंका निरसन करण्यासाठी आपल्या सेवेस उपलब्ध आहेत. आपल्या निरंतर विश्वासास कोणत्याही परिस्थितीत संचालक मंडळ व कर्मचारी वृंदाकडून तडा जाणार नाही अशी ग्वाही आम्ही देत आहोत.

आपल्या पतसंस्थेच्या सर्व शाखांमध्ये सल्लागार मंडळ अस्तित्वात आहे. या सल्लागार मंडळाचे आम्हास वेळोवेळी






मार्गदर्शन मिळत आहे. तसेच शाखांच्या कामकाजावर या सल्लागार मंडळाचेही लक्ष्य आहे. त्यांच्या या योगदानाबददल आम्ही त्यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करतो. सर्व सभासद, ठेवीदार सर्व शाखांचे सल्लागार मंडळ तसेच सर्व हितचिंतकांचे संस्थेवरील प्रेम, निष्ठा, व अतुट विश्वास यापुढेही अटळ राहून भविष्यात जिजाऊ कृपेने वृध्दिंगत होईल व आपली पतसंस्था राज्यात एक नावाजलेली संस्था म्हणून नावारूपास येईल, अशी खात्री बाळगतो. संस्थेचा अहवाल, नफा-तोटा पत्रक व ताळेबंदपत्रक संचालक मंडळाच्या वतीने मान्यतेसाठी आपणासमोर सादर करीत आहोत. आपल्या उपस्थितीबद्दल आपले मनःपूर्वक धन्यवाद !

**❊ सभासद**

पतसंस्थेचे दि. ३१/०३/२०२४ अखेर ५१७० भागधारक सभासद आहेत.

**❊ भागभांडवल**

संस्थेचे अधिकृत भागभांडवल रक्कम रूपये एक कोटी आहे. दि. ३१/०३/२०२३ अखेर वसूल भागभांडवल रु. ५३,४०,१००.०० एवढे होते. अहवाल सालात भागभांडवलामध्ये रु. ४,८२,१००.०० इतकी वाढ झालेली आहे. दि. ३१/०३/२०२४ अखेर पतसंस्थेचे भागभांडवल रु. ५८,२२,२००.०० आहे.

**❊ राखीव व इतर निधी**

संस्थेकडे दि. ३१/०३/२०२४ अखेर रु. १,२९,७८,२९६.७६ इतके राखीव व इतर निधी आहे.

**❊ ठेवी**

दि. ३१/०३/२०२३ रोजी पतसंस्थेकडे रु. ३०,००,६२,९७५.१३ एवढ्या एकूण ठेवी होत्या. अहवाल सालात त्यात रू. १०,०१,६१,४२७.३० इतकी वाढ होऊन दि. ३१/०३/२०२४ अखेर एकूण ठेवी रु. ४०,०२,२४,४०२.४३ झालेल्या आहेत.

**❊ कर्ज वितरण**

दि. ३१/०३/२०२३ अखेर रु. २३,६३,३२,१६६.०२ एवढे कर्ज वितरण केलेले होते. अहवाल सालात त्यात रू.३,५५,२६,०८६.०० इतकी वाढ होऊन दि. ३१/०३/२०२४ अखेर एकूण कर्ज वितरण रु.२७,१८,५८,२५२.०२ झालेले आहे.

**❊ मालमत्ता**

दि.३१/३/२०२४ अखेर डेडस्टॉक, फर्निचर, संगणक इत्यादी रु. ९,७०,१६४.०० व नेवासा शाखा जागा रु. २५,९८,५४०.०० अशी एकूण रू. ३५,६८,७०४.०० संस्थेची मालमत्ता आहे.

**❊ संचालक मंडळ व नातेवाईक कर्जे**

महाराष्ट्र सहकारी कायदा १९६० चे कलम ७२ (२) अन्वये मा. संचालक मंडळ व त्यांच्या नातेवाईकांकडून दि. ३१/०३/२०२४ अखेर येणे कर्ज व थकबाकीबाबतचा तपशील खालीलप्रमाणे

| अ.नं. | तपशील | अहवाल वर्षाअखेर येणे कर्ज रक्कम रुपये | थकित रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| १ | संचालकांची कर्जे | - | - |
| २ | संचालकांचे नातेवाईक यांची कर्जे | ६,९१,३०५.०० | १,८०,४०१.०० |

## ❊ अहवाल सालात झालेला नफा व नफा वाटणी :

पतसंस्थेला अहवाल सालात दि. ३१.०३.२०२४ अखेर रक्कम रुपये १०,२९,८३५.६२ निव्वळ नफा झालेला आहे. सभासदांना १० टक्के लाभांश देण्याची शिफारस संचालक मंडळाने केलेली आहे. तसेच पुढीलप्रमाणे निव्वळ नफ्याची वाटणी करण्याची शिफारस मंडळाने केलेली आहे. त्यास आपण मंजुरी द्यावी, ही विनंती.

| अ.नं. | तपशील | रक्कम रुपये |
|---|---|---|
| १) | **राखीव निधी** (एकूण नफा रक्कमेच्या २५ टक्के) | २,५७,४५९.०० |
| २) | **लाभांश** (दि.३१/३/२०२३ वसूल भागभांडवल रक्कम रु.५३,४०,१००.०० वर १० टक्के) | ५,३४,०१०.०० |
| ३) | **धर्मादाय निधी** (एकूण नफा रक्कमेच्या १ टक्के) | १०,२९८.०० |
| ४) | **सभासद, कर्मचारी कल्याण निधी** (एकूण नफा रक्कमेच्या १० टक्के) | १,०२,९८४.०० |
| ५) | **इमारत निधी** | १,२५,०८४.६२ |
| | एकूण | १०,२९,८३५.६२ |

## ❊ शाखा कामकाज – संस्थेच्या एकूण मुख्य कार्यालयासह ८ शाखा आहेत. शाखेच्या ठेवी व कर्ज वितरणाची माहिती खालीलप्रमाणे

| अ.नं. | तपशील | ठेवी रू. | कर्ज वितरण रू. |
|---|---|---|---|
| १) | मुख्य कार्यालय | ११,२६,३४,३४८.४६ | ४,९६,२४,७५१.०० |
| २) | भिंगार | २,४७,४२,२७७.७८ | ३,३९,०४,०६९.०० |
| ३) | संगमनेर | ६,०२,७८,४७१.२२ | ४,६०,४६,८४७.५२ |
| ४) | नेवासा | ५,३२,२२,९२९.८४ | ३,८७,८५,५७०.०० |
| ५) | पाथर्डी | १,७४,९८,१६६.७० | ३,१३,०३,३३९.५० |
| ६) | मार्केट यार्ड, अ.नगर | ११,५५,१९,५४५.२३ | ६,१०,८२,५८९.०० |
| ७) | शेवगाव | १,००,५३,५७४.२० | ८८,३०,८७६.०० |
| ८) | कर्जत | ६२,७७,४८९.०० | २२,८०,२१०.०० |
| | एकूण | **४०,०२,२६,८०२.४३** | **२७,१८,५८,२५१.०२** |

## ❊ ऋणनिर्देश :

आपल्या संस्थेच्या सर्वांगीण प्रगतीमध्ये सर्व आजी-माजी संचालकांचा तसेच सल्लागार व हितचिंतकांच्या बहुमूल्य मार्गदर्शनाचा, सहकार्याचा आणि पाठिंब्याचा मोठा सहभाग आहे. त्याबद्दल आम्ही त्यांचे ऋणी आहोत. सातत्याने वृद्धिंगत होणाऱ्या ग्राहकांच्या विश्वासावर आणि सहकार्याबद्दल संस्थेने भरीव प्रगती व कामगिरी केलेली आहे. त्यापुढील काळात संस्थेच्या भरभराटीसाठी आतापर्यंत आपण दिलेल्या सहकार्याव्यतिरिक्त अधिक सक्रिय सहभागाची, मार्गदर्शन व विधायक सूचनांची आम्ही अपेक्षा करीत आहोत.

संस्थेला वेळोवेळी मार्गदर्शन व सहकार्य केल्याबद्दल मराठा सेवा संघाचे संस्थापक अध्यक्ष आदरणीय ॲड. पुरुषोत्तम खेडेकर साहेब, जिल्हा उपनिबंधक गणेश पुरी साहेब, तालुका उपनिबंधक शुभांगी गोंड त्यांचे सहकारी, चार्टर्ड अकौंटंट डी.के. काळे, चार्टर्ड अकौंटंट पराग मुथ्था, महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन, अहमदनगर जिल्हा नागरी पतसंस्थेचे फेडरेशन, अहमदनगर तालुका पतसंस्था फेडरेशन, उपनिबंधक सह.संस्था नगर तालुका यांचे कार्यालय, सर्व वर्तमानपत्रे व न्यूज चॅनेलचे संपादक, वार्ताहर व प्रतिनिधी, मराठा सेवा संघ, संभाजी ब्रिगेड, जिजाऊ ब्रिगेड, शंभुराजे युवा क्रांती यांनी अहवाल वर्षात दिलेल्या सक्रिय सहभागाबद्दल आपल्या सर्वांचे आम्ही व आमचे सर्व सहकारी आभार मानून मोकळे न होता सदैव आपल्या ऋणात राहून मराठा सेवा नागरी सहकारी पतसंस्थेचा सन २०२३-२४ चा अहवाल सर्वांना सादर करीत आहोत.

**धन्यवाद ! जय जिजाऊ ! जय शिवराय !**

**पत्रकार शिवश्री किशोर मोहनराव मरकड**
व्हा.चेअरमन

**शिवश्री इंजि. विजयकुमार गोविंदराव ठुबे**
संस्थापक अध्यक्ष, चेअरमन

अहमदनगर जिल्हा मराठा सेवा नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, अहमदनगर

## ताळेबंद पत्रक

| दि.३१/०३/२०२३ | भांडवल व देणी | दि.३१/०३/२०२४ | |
|---|---|---|---|
| रुपये पैसे | | रुपये पैसे | रुपये पैसे |
| **५३,४०,१००.००** | **वसूल भागभांडवल** | **५८,२२,२००.००** | **५८,२२,२००.००** |
| **१,५०,७४,६३८.८४** | **राखीव व इतर निधी** | | **१,२९,७८,२९६.७६** |
| ४९,०८,५२४.८० | राखीव निधी | ५७,०१,३७१.८० | |
| २३,२८,१८५.०४ | इमारत निधी | २५,७७,१४५.९६ | |
| ४८,००,०००.०० | संशयित, बुडीत व एन.पी.ए. कर्ज | २३,७८,७९७.०० | |
| १५,००,०००.०० | थकित येणे व्याज | २,३४,४०५.०० | |
| ९४,१५०.०० | धर्मादाय निधी | १,०२,२५८.०० | |
| २,४८,५५८.०० | सभासद, कर्मचारी कल्याण निधी | २,८९,०९८.०० | |
| ७,०८,९९६.०० | उत्तम कर्जावरील तरतूद | १०,०८,९९६.०० | |
| १,८६,२२५.०० | सांस्कृतिक कार्यक्रम निधी | १,८६,२२५.०० | |
| ३,००,०००.०० | ग्रॅच्युईटी निधी | ५,००,०००.०० | |
| **३०,००,६२,९७५.१३** | **ठेवी** | | **४०,०२,२६,८०२.४३** |
| १०,६४,६३,७०७.०० | मुदत | १०,७८,५८,५७२.०० | |
| ३,०४,२९,३६५.१३ | बचत ठेव | ५,३१,२८,१३२.४३ | |
| १,८१,६९,६८२.०० | दामदुप्पट | १,९३,६०,९७४.०० | |
| ५,६७,१००.०० | संचित | ११,४६,४००.०० | |
| ३९,२३,५४५.०० | दैनंदिन | ४९,०४,८६२.०० | |
| १३,६२,८१,८३७.०० | ज्येष्ठ नागरिक | १७,९६,०४,९३३.०० | |
| २५,०७१.०० | करंट खाते | २५,०७१.०० | |
| १७,७३,७६८.०० | कर्ज अनामत | १९,९०,०६८.०० | |
| ७,८६,९००.०० | जिजाऊ लखपती | ७,०५,७००.०० | |
| १६,४२,०००.०० | शंभूराजे चिरंजीव | २१,२८,०००.०० | |
| – | जिजाऊ ठेव | २,४९,८७,०९०.०० | |
| – | ऑन कॉल डिपॉझिट | ४३,२७,०००.०० | |
| – | गोल्डन फ्रायडे सेव्हिंग | ६०,०००.०० | |
| **१,१५,५०,९९०.००** | **इतर देणी व तरतुदी** | | **१,३७,०१,३४३.००** |
| ७६,३२,१३६.०० | ठेवीवरील व्याज | ९०,०५,९८०.०० | |
| १,८०,३६३.०० | ऑडिट फी | ३,०३,३६३.०० | |
| १२,२००.०० | निवडणूक खर्च | ५,१२,२००.०० | |
| ३,५९,०४३.०० | बोनस | ३,०२,०१७.०० | |
| २,१४,१६७.०० | वसुली खर्च | ३,९६,००५.०० | |
| ५,५०,४४८.०० | कायदा खर्च | ६,००,७९८.०० | |
| २१,८७,५७०.०० | अनामत | २१,९१,८८८.०० | |
| ४,१५,०६३.०० | लाभांश | ३,८९,०९२.०० | |
| **५,५१,१४,८३०.९०** | **शाखा देणे (दुबेरजी)** | **४,६१,१९,४५७.२८** | **४,६१,१९,४५७.२८** |
| **८,१०,७९३.९२** | **निव्वळ नफा** (दि. ३१/०३/२०२४) | **१०,२९,८३५.६२** | **१०,२९,८३५.६२** |
| **३८,७९,५४,३२८.७९** | **एकूण** | **४७,९८,७७,९३५.०९** | **४७,९८,७७,९३५.०९** |

**दि.३१/०३/२०२४ अखेर**

| दि.३१/०३/२०२३ रुपये पैसे | जिंदगी व येणी | दि.३१/०३/२०२४ रुपये पैसे | दि.३१/०३/२०२४ रुपये पैसे |
|---|---|---|---|
| **११,०८,९३७.००** | **रोख शिल्लक** | ९,८०,७५७.०० | ९,८०,७५७.०० |
| **३,१५,६०,६००.८७** | **बँकेतील शिल्लक** | २,६३,९०,६६१.०७ | २,६३,९०,६६१.०७ |
| **४,८९,७०,९११.००** | **गुंतवणूक** | ११,९९,१९,५३९.०० | ११,९९,१९,५३९.०० |
| **६२,४९६.००** | **डिपॉझिट** | २,६२,४९६.०० | २,६२,४९६.०० |
| **२३,६३,३२,१६६.०२** | **कर्ज व उचल** | | २७,१८,५८,२५२.०२ |
| १,५९,८१,३४२.०० | वैयक्तिक | १,४४,०३,४२६.०० | |
| ३५,३४,६११.०० | व्यावसायिक | ३२,०८,४९१.०० | |
| ३,२३,३९,९२४.४० | ठेव तारण | ५,०९,४२,६९१.४० | |
| ३४,०७,०४८.०० | वाहन तारण | २१,०८,९८६.०० | |
| १९,३६,३००.०० | दैनंदिन | ३६,५३,९०२.०० | |
| ६,१४,१५१.०० | सुलभ | ३,६९,९७१.०० | |
| ५,५१,७५,७३६.०० | सोने तारण | ६,८४,६८,६२०.०० | |
| - | सोने तारण कॅश क्रेडिट | ६,५४,५३०.०० | |
| ५,२१,४८,६९४.६२ | कॅश क्रेडिट | ५,२१,२४,३८८.६२ | |
| ७,११,९४,३५९.०० | स्थावर तारण | ७,५९,२३,२४६.०० | |
| **३५,७१,७११.००** | **मालमत्ता** | | ३५,६८,७०४.०० |
| ९,७३,१७९.०० | फर्निचर डेडस्टॉक | ९,७०,१६४.०० | |
| २५,९८,५४०.०० | नेवासा शाखा जागा | २५,९८,५४०.०० | |
| **१,१२,३२,५८८.००** | **इतर जिंदगी** | | १,०७,७८,०६८.७२ |
| ३०,५६,७४३.०० | बँक गुंतवणूक व्याज | २८,२४,२२२.०० | |
| ७२,६७,७८५.०० | कर्ज व्याज येणे | ६६,२१,०४३.०० | |
| ८४,६००.०० | ॲडव्हान्स | १,५४,८००.०० | |
| ८,२३,४६०.०० | टी.डी.एस. | ४,७८,००३.७२ | |
| - | निवडणूक प्राधिकरण | ७,००,०००.०० | |
| **५,५१,१४,८३०.९०** | **शाखा येणे (दुबेरजी)** | ४,६१,१९,४५७.२८ | ४,६१,१९,४५७.२८ |
| **३८,७९,५४,३२८.७९** | **एकूण** | ४७,९८,७७,९३५.०९ | ४७,९८,७७,९३५.०९ |

## नफा-तोटा पत्रक

| दि.३१/०३/२०२३ | खर्च | दि.३१/०३/२०२४ | |
|---|---|---|---|
| रुपये पैसे | | रुपये पैसे | रुपये पैसे |
| **२,४१,०६,२२८.००** | **ठेवीवरील व्याज** | **२,८८,२६,६५५.००** | **२,८८,२६,६५५.००** |
| **१२,२५,६२६.००** | **कर्जावरील व्याज व इतर** | | **९,३०,६६४.००** |
| ८,८५,००५.०० | बँक ओडी व्याज | ३,३६,३५८.०० | |
| ३,४०,६२१.०० | दैनंदिन ठेव प्रतिनिधी कमिशन | ५,१५,६१९.०० | |
| - | कर्ज व्याज रिबेट | ७८,६८७.०० | |
| **६८,८३,५३७.००** | **शाखाअंतर्गत व्याज** | **३९,७१,८१३.००** | **३९,७१,८१३.००** |
| **३४,२०,३७७.००** | **कर्मचारी पगार व भत्ते** | **४२,६५,६८७.००** | **४२,६५,६८७.००** |
| **२२,५९,७५७.३८** | **प्रशासकीय व व्यवस्थापकीय खर्च** | | **२२,९१,१५८.८०** |
| ५२,३५३.०० | छपाई व स्टेशनरी | ७१,७५३.०० | |
| ४१,८७५.०० | टेलिफोन | ४७,६४८.०० | |
| १५,४५०.०० | गुणगौरव समारंभ | ९,८००.०० | |
| १,११,५२१.०० | सभा समारंभ | १,८९,७४५.०० | |
| ६,०२,८८६.०० | इमारत भाडे | ६,४६,१४८.०० | |
| - | महानगरपालिका कर | ५७,२०५.०० | |
| १,६०,२५८.०० | कायदा खर्च | - | |
| २,३०,७०२.०० | घसारा | १,७९,७४४.०० | |
| ५१,८२०.०० | इलेक्ट्रिकल्स व फर्निचर दुरुस्ती | २५,९५४.०० | |
| १,६५,२७५.०० | इतर | १,६७,६६६.०० | |
| १,०३,९९३.०० | प्रवास | ७७,१८४.०० | |
| १,२४,७१०.०० | सादिलवार | १,०३,५८८.०० | |
| ८३,६३०.०० | लाईट बिल | ८९,७७०.०० | |
| २०,३२९.०० | झेरॉक्स | ३६,४३०.०० | |
| १,२७,५७०.०० | संगणक दुरुस्ती व देखभाल | ७०,७३०.०० | |
| २१,०४६.०० | लॉकर भाडे | ७४,४६१.०० | |
| - | आरटीओ ट्रेड सर्टिफिकेट खर्च | २४,१८०.०० | |
| १,५१,११०.०० | वार्षिक सर्वसाधारण सभा | १,६७,६११.०० | |
| ३८,४२०.०० | विमा | ३६,९२३.०० | |
| ६,०१०.०० | वृत्तपत्रे व मासिक | ४,११३.०० | |
| ५१,२१२.०० | प्रशिक्षण | १,८७,३८५.०० | |
| १३,६८७.३८ | बँक कमिशन | १६,९६०.८० | |
| ५,९००.०० | वार्षिक वर्गणी | - | |
| - | प्रोफेशनल फि | ६,०००.०० | |
| **३४,४१,६७०.००** | **तरतुदी** | | **१८,०१,०६१.००** |
| १९,८९,४१५.०० | एन.पी.ए. | २,००,०००.०० | |
| ६,२५,००१.०० | थकीत व्याज | १,०१,०६१.०० | |
| ८४,१५०.०० | उत्तम कर्ज व्याज | ३,००,०००.०० | |
| २,००,०००.०० | ऑडिट फी | ३,००,०००.०० | |
| २,००,०००.०० | ग्रॅच्युईटी | २,००,०००.०० | |
| ३,४३,१०४.०० | बोनस | २,००,०००.०० | |
| - | निवडणूक खर्च | ५,००,०००.०० | |
| **८,१०,७९३.९२** | **निव्वळ नफा ताळेबंदाकडे वर्ग** | **१०,२९,८३५.६२** | **१०,२९,८३५.६२** |
| **४,२१,४७,९८९.३०** | **एकूण** | **४,३१,१६,८७४.४२** | **४,३१,१६,८७४.४२** |

**दि.०१/०४/२०२३ ते ३१/०३/२०२४**

| दि.३१/०३/२०२३ रुपये पैसे | उत्पन्न | दि.३१/०३/२०२४ रुपये पैसे | दि.३१/०३/२०२४ रुपये पैसे |
|---|---|---|---|
| **३,५०,७२,११७.३०** | **मिळालेले व्याज** | | **३,८८,८१,६०२.४२** |
| ३,०७,१५,४४९.०० | कर्जावरील व्याज | ३,२८,१०,५७३.०० | |
| १४,६८,९५०.०० | कर्जावरील दंड व्याज | १६,९८,४६६.०० | |
| २८,८७,७९८.३० | गुंतवणुकीवरील व्याज | ४३,७२,५६३.४२ | |
| **६८,८३,५३७.००** | **शाखाअंतर्गत व्याज** | **३९,७१,८१३.००** | **३९,७१,८१३.००** |
| **१,९२,२५५.००** | **इतर जमा** | | **२,६३,४५९.००** |
| ६,७१०.०० | जिल्हा बँक लाभांश | ६,१००.०० | |
| १,८५,५४५.०० | प्रोसेस फी | २,१२,३६०.०० | |
| - | फॉर्म फी | ४४,९९९.०० | |
| ४,२१,४७,९८९.३० | एकूण | ४,३१,१६,८७४.४२ | ४,३१,१६,८७४.४२ |

## अंदाजपत्रकापेक्षा सन २०२३-२४ मधील कमी-जादा झालेला खर्च व सन २०२४-२५ चे अंदाजपत्रक

| खर्च खाते तपशील | सन २०२३-२४ सालासाठी अंदाज रुपये पैसे | सन २०२३-२४ प्रत्यक्ष झालेला खर्च रुपये पैसे | अंदाजपत्रकापेक्षा जादा रुपये पैसे | अंदाजपत्रकापेक्षा कमी रुपये पैसे | सन २०२४-२५ सालासाठी अंदाज रुपये पैसे |
|---|---|---|---|---|---|
| ठेवीवरील व्याज | ३,०१,३२,०००.०० | २,८८,२६,६५५.०० | - | १३,०५,३४५.०० | ३,६०,००,०००.०० |
| बँक ओडी व्याज | ११,०६,०००.०० | ३,३६,३५८.०० | - | ७,६९,६४२.०० | ४,००,०००.०० |
| दैनंदिन ठेव प्रतिनिधी कमिशन | ३,००,०००.०० | ५,१५,६१९.०० | २,१५,६१९.०० | - | ६,५०,०००.० |
| कर्जावरील रिबेट व्याज | १,००,०००.०० | ७८,६८७.०० | - | २१,३१३.०० | २,००,०००.०० |
| कर्मचारी पगार व भत्ते | ४३,७५,०००.०० | ४२,६५,६८७.०० | - | १,०९,३१३.०० | ५४,५०,०००.०० |
| छपाई व स्टेशनरी | ८०,०००.०० | ७१,७५३.०० | - | ८,२४७.०० | २,००,०००.०० |
| टेलिफोन | ३०,०००.०० | ४७,६४८.०० | १७,६४८.०० | - | ६०,०००.०० |
| गुणगौरव समारंभ | ५०,०००.०० | ९,८००.०० | - | ४०,२००.०० | २०,०००.०० |
| सभा समारंभ | २,००,०००.०० | १,८९,७४५.०० | - | १०,२५५.०० | २,५०,०००.०० |
| इमारत भाडे | ७,५३,६००.०० | ६,४६,१४८.०० | - | १,०७,४५२.०० | ८,१०,०००.०० |
| महानगर पालिका कर | ५७,२००.०० | ५७,२०५.०० | ५.०० | - | ३०,०००.०० |
| कोर्ट | २,००,०००.०० | - | - | २,००,०००.०० | १,००,०००.०० |
| घसारा | २,८८,३००.०० | १,७९,७४४.०० | - | १,०८,५५६.०० | २,२५,०००.०० |
| इलेक्ट्रिकल्स व फर्निचर दुरूस्ती | ६५,०००.०० | २५,९५४.०० | - | ३९,०४६.०० | ५०,०००.०० |
| इतर | १,६०,०००.०० | १,६७,६६६.०० | ७,६६६.०० | - | २,००,०००.०० |
| प्रवास | १,२९,०००.०० | ७७,१८४.०० | - | ५१,८१६.०० | ९०,०००.०० |
| सादिलवार | १,५५,०००.०० | १,०३,५८८.०० | - | ५१,४१२.०० | १,३०,०००.०० |
| लाईट बिल | ९०,०००.०० | ८९,७७०.०० | - | २३०.०० | १,१५,०००.०० |
| झेरॉक्स | २५,०००.०० | ३६,४३०.०० | ११,४३०.०० | - | ४६,०००.०० |
| संगणक दुरूस्ती व देखभाल | १,५९,०००.०० | ७०,७३०.०० | - | ८८,२७०.०० | २,००,०००.०० |
| लॉकर भाडे | २६,०००.०० | ७४,४६१.०० | ४८,४६१.०० | - | ९०,०००.०० |
| आर.टी.ओ. ट्रेड सर्टिफिकेट | ४०.०००.०० | २४,१८०.०० | - | १५,८२०.०० | ३०,०००.०० |
| वार्षिक साधारण सभा | १,८८,०००.०० | १,६७,६९१.०० | - | २०,३०९.०० | २,१०,०००.०० |
| विमा | ४८,०००.०० | ३६,९२३.०० | - | ११,०७७.०० | ५०,०००.०० |
| वृत्तपत्रे व मासिक | ७,५००.०० | ४,१९३.०० | - | ३,३०७.०० | १०,०००.०० |
| प्रशिक्षण | १,००,०००.०० | १,८७,३८५.०० | ८७,३८५.०० | - | २,००,०००.०० |
| बँक कमिशन | २०.०००.०० | १६,९६०.८० | - | ३,०३९.२० | २०,०००.०० |
| वार्षिक वर्गणी | ७,३००.०० | - | - | ७,३००.०० | १०,०००.०० |
| प्रोफेशनल व कन्संल्टट फी | २,००,०००.०० | ६,०००.०० | - | १,९४,०००.०० | १०,०००.०० |
| व्यवसाय कर | २,०००.०० | - | - | २,०००.०० | २,२५०.०० |
| संचालक मंडळ बैठक भत्ता | २०,०००.०० | - | - | २०,०००.०० | २,००,०००.०० |
| संचालक मंडळ प्रवास भत्ता | २०,०००.०० | - | - | २०,०००.०० | ५०,०००.०० |

# अंदाजपत्रकापेक्षा सन २०२३-२४ मधील कमी-जादा झालेला खर्च व सन २०२४-२५ चे अंदाजपत्रक

| खर्च खाते तपशील | सन २०२३-२४ सालासाठी अंदाज रुपये पैसे | सन २०२३-२४ प्रत्यक्ष झालेला खर्च रुपये पैसे | अंदाजपत्रकापेक्षा जादा रुपये पैसे | अंदाजपत्रकापेक्षा कमी रुपये पैसे | सन २०२४-२५ सालासाठी अंदाज रुपये पैसे |
|---|---|---|---|---|---|
| जाहिरात | १,००,०००.०० | - | - | १,००,०००.०० | ५०,०००.०० |
| पोस्टेज | २०,०००.०० | - | - | २०,०००.०० | १०,०००.०० |
| एन.पी.ए. तरतूद | १०,००,०००.०० | २,००,०००.०० | - | ८,००,०००.०० | ३,००,०००.०० |
| थकित व्याज तरतूद | २,००,०००.०० | १,०१,०६१.०० | - | ९८,९३९.०० | २,००,०००.०० |
| उत्तम कर्जावरील तरतूद | २,००,०००.०० | ३,००,०००.०० | १,००,०००.०० | - | ४,४०,०००.०० |
| ऑडिट फि तरतूद | २,५०,०००.०० | ३,००,०००.०० | ५०,०००.०० | - | ४,००,०००.०० |
| ग्रॅज्युईटी तरतूद | १,००,०००.०० | २,००,०००.०० | १,००,०००.०० | - | ३,००,०००.०० |
| बोनस तरतूद | ४,००,०००.०० | २,००,०००.०० | - | २,००,०००.०० | २,५०,०००.०० |
| निवडणूक खर्च तरतूद | ७,००,०००.०० | ५,००,०००.०० | - | २,००,०००.०० | ७,००,०००.०० |
| सामोपचार योजना तरतूद | ४,००,०००.०० | - | - | ४,००,०००.०० | ५,००,०००.०० |
| नफा | ९,००,०००.०० | १०,२९,८३५.६२ | १,२९,८३५.६२ | - | १२,७८,७५०.०० |
| एकूण | ४,३४,०३,९००.०० | ३,९१,४५,०६१.४२ | ७,६८,०४९.६२ | ५०,२६,८८८.२० | ५,०५,३७,०००.०० |

| उत्पन्न खाते तपशील | सन २०२३-२४ सालासाठी अंदाज रुपये पैसे | सन २०२३-२४ प्रत्यक्ष मिळालेले उत्पन्न रुपये पैसे | अंदाजपत्रकापेक्षा जादा रुपये पैसे | अंदाजपत्रकापेक्षा कमी रुपये पैसे | सन २०२४-२५ सालासाठी अंदाज रुपये पैसे |
|---|---|---|---|---|---|
| कर्जावरील व्याज | ३,९२,००,०००.०० | ३,२८,१०,५७३.०० | - | ६३,८९,४२७.०० | ४,३१,९०,०००.०० |
| कर्जावरील दंड व्याज | १,००,०००.०० | १६,९८,४६६.०० | १५,९८,४६६.०० | - | १०,००,०००.०० |
| गुंतवणुकीवरील व्याज | ३६,००,०००.०० | ४३,७२,५६३.४२ | ७,७२,५६३.४२ | - | ५९,५०,०००.०० |
| लाभांश | ९,०००.०० | ६,१००.०० | - | २,९००.०० | ७,०००.०० |
| प्रोसेस फी | ४,५०,०००.०० | २,१२,३६०.०० | - | २,३७,६४०.०० | ३,००,०००.०० |
| फॉर्म फी | ४४,९००.०० | ४४,९९९.०० | ९९.०० | - | ९०,०००.०० |
| एकूण | ४,३४,०३,९००.०० | ३,९१,४५,०६१.४२ | २३,७१,१२८.४२ | ६६,२९,९६७.०० | ५,०५,३७,०००.०० |

# वैधानिक लेखापरीक्षकाचा अहवाल

(महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा कलम ८१ (५-ब) आणि
महाराष्ट्र सहकारी संस्था नियम ६९ अन्वये द्यावयाचा)

प्रति,

चेअरमन / व्यवस्थापक,
अहमदनगर जिल्हा मराठा सेवा नागरी सहकारी पतसंस्था मर्या., अहमदनगर
बारातोटी कारंजा, माळीवाडा, जि. अहमदनगर

**संदर्भ : वार्षिक सर्वसाधारण सभा दि. २३/०९/२०२३, ठराव क्रमांक :- ०७**

**१) आर्थिक विवरण पत्रकाबाबत वैधानिक लेखापरीक्षकाचा अभिप्राय :-**

अहमदनगर जिल्हा मराठा सेवा नागरी सहकारी पतसंस्था मर्या., बारातोटी कारंजा, माळीवाडा, जि. अहमदनगर या संस्थेचे दि. ०१/०४/२०२३ ते ३१/०३/२०२४ या आर्थिक वर्षातील आर्थिक विवरण पत्रकांचे लेखापरीक्षण केलेले असून त्यामध्ये दि. ३१/०३/२०२४ या दिनांकाचा ताळेबंद, त्या दिनांकास संपणारे नफा तोटा पत्रक आणि त्यामध्ये समाविष्ट केलेल्या हिशेबाच्या धोरणांचा अर्थपूर्ण सारांश व इतर स्पष्टीकरणात्मक माहितीचा समावेश आहे.

**२) आर्थिक विवरण पत्रकाबाबत व्यवस्थापनाची जबाबदारी :-**

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० आणि त्या अंतर्गत बनविलेल्या नियमान्वये आर्थिक विवरण पत्रके तयार करण्याची जबाबदारी व्यवस्थापनाची आहे. सदर जबाबदारीमध्ये आर्थिक पत्रके तयार करतांना अपहार किंवा चुक यामुळे होणा-या लक्षणीय चुकांपासून मुक्त राहतील अशा प्रकारचे अंतर्गत नियंत्रण ठेवणे बाबत संकल्पना तयार करणे व ते अंमलात आणणे यांचा समावेश असेल.

**३) लेखापरीक्षकाची जबाबदारी :-**

अ) आर्थिक हिशेबपत्रके बनविणे ही संस्थेच्या व्यवस्थापनाची जबाबदारी असून त्यावर मतप्रदर्शन करणे ही आमची जबाबदारी आहे. आम्ही आमचे लेखापरीक्षण हे भारतीय सनदी लेखापाल संस्था यांनी तयार केलेल्या तपासणीसाठी लागू असलेले मानदंड व महाराष्ट्र सहकारी संस्था कायद्यास अनुसरून केलेले आहे. ह्या मानदंडानुसार आम्हाला आमच्या तपासणीची आखणी आणि अंमलबजावणी अशा प्रकारे करावी लागते की ज्या योगे ह्या हिशेबात लक्षणीय चुका नाहीत ह्याची सर्वसाधारण खात्री पटेल.

ब) लेखापरीक्षणामध्ये लेखापरीक्षणामधील जे उघड न केलेले आणि रक्कम यातील पुरावा जमा करण्याची पध्दत आहे व ते लेखापरिक्षकाच्या अभिप्रायावर अवलंबून आहे, यामध्ये महत्वाच्या चुकीच्या आर्थिक विवरण पत्रकामधील धोक्याचे निर्धारण करण्याची पध्दत जर ती फसवणूक किंवा चुकीमुळे असेल त्यावर अवलंबून आहे. संस्थेने तयार केलेल्या आर्थिक विवरण अंतर्गत नियंत्रण आणि रास्त सादरीकरण विनियोजनेच्या वापराची पध्दत उचित परिस्थितीत योग्य आहे. लेखापरीक्षणामध्ये जमाखर्चाचा अंदाज त्याच प्रमाणे संपूर्ण आर्थिक विवरण पत्रकांचे सादरीकरण यांचा समावेश होतो.

क) आमच्या लेखापरीक्षणासाठी माझ्या संपूर्ण ज्ञानाप्रमाणे व विश्वासाप्रमाणे जरूर ती सर्व माहिती, पुरावे व खुलासे आम्हाला उपलब्ध झाले आहेत.

**४) अभिप्रायः**

अ) आमच्या मते आणि आम्हांस मिळालेल्या माहिती व खुलाशांच्या आधारे व आवश्यक असलेल्या माहितीच्या आधारे

सदर संस्थेचे हिशेब व एकत्रीत केलेल्या टिप्पणी या महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चा कायदा, महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ व इतर लागू असलेल्या कायद्यानुसार तसेच संस्थांसाठी लागणारे निबंधकाने वेळोवेळी जारी केलेले परिपत्रकानुसार आणि भारतामध्ये सर्वसाधारणपणे वापरली जाणारी हिशेबी तत्वानुसार सत्य व रास्त स्थिती दर्शवितात.

१. ताळेबंदाचे बाबतीत दि. ३१/०३/२०२४ ची संस्थेची स्थिती आणि

२. नफा तोटा पत्रकाचे बाबतीत त्या दिनांकास संपणा–या बर्षाचे अगर मुदतीच्या संस्थेच्या नफ्याची / तोटयाची सोबत जोडलेल्या लेखापरीक्षण भाग अ. ब आणि क मध्ये केलेल्या अवलोकनास पात्र राहून सत्य व रास्त स्थिती दर्शवित आहे.

**५) इतर कायदेशीर नियमावली संदर्भात अभिप्रायः**

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमातील तरतूदीनुसार ताळेबंद व नफा आणि तोटा पत्रक तयार करण्यात आलेली आहेत.

**६) मी अहवाल देतो की,**

अ) लेखापरीक्षणाच्या उद्देशासाठी आमच्या संपूर्ण ज्ञानाप्रमाणे, माहितीप्रमाणे व विश्वासाप्रमाणे जरूर ती सर्व माहिती व खुलासे मला उपलब्ध झाले आहेत. व ते पुरेशे आहेत.

ब) आमच्या तपासणीतून जितपत दृष्टीपत्तीस येईल, त्याप्रमाणे संस्थेने केलेले व्यवहार हे संस्थेच्या अधिकार मर्यादेच्या आतील आहेत.

क) आमच्या लेखापरीक्षणासाठी संस्थेच्या कार्यालयाकडून आलेली विवरणपत्रे योग्य व परिपूर्ण आहेत.

**७) आमच्या मताप्रमाणे ताळेबंद आणि नफा तोटा पत्रक यांचे लेखांकन मानकाप्रमाणे आहे.**

**८) मी पुढे असा अहवाल देतो की,**

१. या अहवालासंदर्भातील ताळेबंद व नफा–तोटा पत्रक हे हिशेबाची पुस्तके व विवरणपत्रकानुसार जुळतात.

३. संस्थेच्या शाखांचे हिशेबाची तपासणी करून आलेले लेखापरिक्षकांचे अहवाल हे आमचा लेखापरिक्षण अहवाल तयार करतांना योग्य त्या ठिकाणी विचारात घेण्यात आलेले आहेत.

**४. संस्थेस चालू तपासणी (०१/०४/२०२३ ते ३१/०३/२०२४) या कालावधीसाठी ऑडिट वर्ग 'अ' देण्यात येत आहे.**

स्थळ– अहमदनगर
दिनांक – २८/०८/२०२४

**मे.डी.के.काळे ॲण्ड कं. करीता**
सनदी लेखापरीक्षक

**सीए डी.के.काळे**
(भागीदार)
नामतालिका क्र.: १०१५९१३
बर्गवारी : अ

# श्री संत सद्‌गुरू गोदड महाराज

महाराष्ट्र ही संतांची व विरांची भूमी म्हणून ओळखली जाते. राज्यातील प्रत्येक गावाला कोणता ना कोणता राजकीय वा धार्मिक असा वारसा हा लाभलेला आहे. विविधतेने नटलेला माझा हा महाराष्ट्रबद्दल नेहमीच म्हटले जाते **राकट देशा कणखर देशा महाराष्ट्र देशा.** संतांचीदेखील मोठी परंपरा या महाराष्ट्राला आहे. ज्ञानोबांनी वारकरी संप्रदायाचा पाया रचला तर तुकोबा महाराजांनी कळस चढवला असा या संतपरंपरेचा वारसा अहमदनगर जिल्ह्यातील कर्जत तालुक्यानेदेखील जपला आहे.

कर्जत तालुक्याला पूर्वी कर्णग्राम म्हणून ओळखले जात होते. अशा या कर्णग्राममध्ये संत सद्‌गुरू गोदड महाराज यांचा जन्म शके १६ श्रावण शुद्ध दशमी गुरुवार पुष्य नक्षत्रावर शके १६८१/सन १७५९ उदयपूरच्या भोसले घराण्यात झाला. त्यांचे आजोळ हे कर्जत (तत्कालीन कर्णग्राम) येथील तोरडमल घराण्यात होते. अमृतसिंह-अमृत अशी अनेक जन्मगाव असले तरी ते पुढे गोदड महाराज याच नावाने सर्वपरिचित झाले. राजघराण्यात जन्म झाला असला तरी लहानपणापासून कोणत्याही भौतिक गोष्टींची लालसा त्यांच्या मनात नव्हती.

राजघराणे असूनही त्यांचे मन कशातही रमत नव्हते. वैराग्याचा विचार असलेले महाराज सतत पांडुरंगाच्या नामस्मरणात दंग राहत. त्यांचा स्वभाव निर्भय, शीघ्रकोपी पण क्षमाशील होता. पांडुरंगाच्या नामस्मरणात त्यांना आनंद मिळे.

त्यांचा स्वभाव विरक्त असल्यामुळे वयाच्या सातव्या वर्षी जय विठ्ठल म्हणून त्यांनी राजघराण्याचा त्याग केला. दगडाचे टाळ करून विठ्ठल नाम घेत ते परमेश्वराच्या शोधासाठी फिरत होते. घरादाराचा त्याग केल्याने खऱ्या अर्थाने त्यांना आपल्याला विठ्ठलानेच मुक्त केले असे म्हणत त्यांनी आनंद साजरा केला. विठ्ठलाचा शोध घेत असताना त्यांची भेट पैठणचे संत एकनाथ महाराज यांच्या शिष्य परंपरेतील शिष्य नारायण नाते यांच्याशी झाली. त्यांनी गोदड महाराजांना संप्रदायाची दीक्षा दिली व आपल्याजवळील गोधडी अमरसिंहाच्या अंगावर टाकून सांगितले की आता यापुढे तुझे नाव गोदडनाथ म्हणजेच गोदड महाराज असे झाले आणि याच नावाने ते आज सर्वत्र प्रसिद्ध झाले.

महाराजांनी सातपुडा पर्वतावर १७ वर्षे खडतर तपश्चर्या केली. विठ्ठल-रूक्मिणीने त्यांना दर्शन दिले. यावेळी त्यांनी सातपुडा पर्वतात वजेश्वरीदेवी यांनी देखील प्रसन्न होऊन दर्शन दिले व आशीर्वाद दिला.

आजही वज्रेश्वरी येथे भव्य अशा देवीच्या ठिकाणी उजव्या बाजूला गोदड महाराजांच्या पादुका आहेत. मंदिराच्या वरती गोदड महाराजांचे छोटे मंदिर देखील आहे. डोंगरावर असणारे हे मंदिर अतिशय सुंदर आणि निसर्गाच्या सान्निध्यामध्ये आहे. या वज्रेश्वरीच्या ठिकाणी गरम पाण्याचे झरे आहेत. अनेक भाविक या झऱ्यामध्ये स्नान करतात. तेथे शरीरातील दोष याचा नायनाट होतो. अशी आख्यायिका याबाबत सांगितली जाते.

गोदड सातारा जिल्ह्यातील वाठार व फलटण या परिसरामध्ये अनेक वर्षे वास्तव्यास होते. ते कर्णग्राम म्हणजे कर्जत येथे आजोळी आले. यावेळी त्यांची ग्रामस्थांनी मिरवणूक काढली. पांडुरंगाच्या भेटीसाठी महाराज पंढरपूर येथे गेल्यानंतर तिथे त्यांना तत्कालीन उच्च कुलीन मानल्या जाणाऱ्या स्त्रीकडून अपमान झाल्याची घटना घडली असे सांगण्यात येते. त्यामुळेच संतप्त महाराजांनी देहत्यागाची तयारी केली; परंतु भगवंताच्या साक्षात्कारी उपदेशाने त्यांना कर्जत ग्रामी येऊन तेथे समाधिस्थ व्हावे अशी भगवंताची आज्ञा मिळाली व स्वतः पांडुरंगाने आषाढी एकादशीला तुला भेटायला कर्जत ग्रामी येईल असे वचन दिले आजही कर्जत येथून पंढरपूरला

पालखी न जाता पंढरपुराहून गोदड महाराजांच्या भेटीस येतात. नंतर भव्य अशी लाकडे रथामध्ये पांडुरंगाची मूर्ती ठेवून शहरामध्ये मिरवणूक काढण्यात येते. हा रथ दोरखंडाने ओढला जातो. हा रथ ओढणे मोठे पुण्यांचे काम समजले जाते. त्यामुळे हजारो नागरिक रोज रथ ओढण्यासाठी येतात.

गोदड महाराजांविषयी अनेक आख्यायिका सांगितल्या जातात. महाराजांनी सूर्यप्रकाश असताना देखील काळोख निर्माण करण्याचे सामर्थ्य भाविकांना दाखविले होते. महाराजांचा मोठा अभ्यास असल्यामुळे देशातील एक ठिकाणावरून संत-महंत अभ्यास व त्याच्यांशी चर्चा करण्यासाठी येत. गोदड महाराजांनी मोठ्या प्रमाणामध्ये लिखाण केलेले आहे. जगतारक असा ग्रंथदेखील त्यांनी लिहिला आहे. याशिवाय योग सिद्धांत, संत विजय योग निर्माण गोदड रामायण अशा अनेक ग्रंथांची निर्मिती व रचना त्यांनी केली आहे.

**संपूर्ण विश्वाचे भविष्य**

प्रत्येक वर्षी चैत्र पाडव्याला कर्जत येथील गोदड महाराज मंदिरामध्ये राजकीय, सामाजिक, शेती पीक येथील पीकपाणी पाऊस याविषयी महाराजांनी लिहून ठेवलेल्या संवत्सरीचे वाचन केले जाते. ही शेकडो वर्षांची परंपरा आहे. महाराजांनी लिहून ठेवलेले सर्व भाकित त्यावर्षात खरे ठरतात. अशी भाविकांची भावना आहे.

**संजीवन समाधी**

गोदड महाराजांनी कर्जत येथेच महासाध्वी उमाबाई यांच्याहस्ते दूध प्राशन करून शके १७५९ /सन १८५७ माघ कृष्ण चतुर्थी मंगळवार रोजी माध्यान वेळी संजीवनी समाधी घेतली. विशेष म्हणजे महाराजांनी स्वतः जिवंत असताना समाधी बांधून घेतलेली नाही. ज्ञानेश्वर माऊलींनीही ज्याप्रमाणे आळंदीत संजीवन समाधी घेतली. त्याचपद्धतीने संत गोदड महाराज यांनी देखील कर्जत येथे संजीवन समाधी घेतली आहे. संत गोदड महाराज यांच्या जन्मोत्सव पुण्यतिथी या निमित्ताने मोठे उत्सव साजरे करण्यात येतात. गोदड महाराजांनी याठिकाणी संजीवन समाधी घेऊन कर्जत तालुक्याची आध्यात्मिकदृष्ट्या पावन केली. एक मोठी शक्ती या देवस्थानमध्ये आहे. आपण जेव्हा येथे मंदिरात येतो आणि त्याठिकाणी दर्शनाला आल्यानंतर त्याची प्रचिती प्रत्येक संवेदनशील मनाला झाल्याशिवाय राहात नाही. महाराजांनी आपल्या जीवितकाळात अनेक महत्त्वाच्या तत्वज्ञान, अध्यात्म, वैद्यकशास्त्र यांसारख्या विषयांवर विपुल लेखन केले. त्यांच्या कर्जत येथील वास्तव्यात त्यांनी अनेक रुग्णांवर यशस्वी औषधी उपचार केले. त्यांच्या या सर्व ग्रथांचे व इतर सामग्री यांचे दर्शन मंदिराच्या मागील बाजूस घेता येते.

**सण/उत्सव :**

माघ चतुर्दशीला मोठा समाधी सोहळा होतो. गुढीपाडव्याला संवत्सर सोहळा असतो. प्रत्येक एकादशीला दिंडी व कीर्तन असते. रथ यात्रा कामिका एकादशीला व पायी दिंडीला असते. जयंतीच्या दिवशी जन्मोत्सव सोहळा इत्यादी कार्यक्रम होतात. सद्‌गुरू गोदड महाराज हे मराठा समाजातील संत या जिल्ह्यात होऊन गेले त्यांच्या कार्याची ओळख संपूर्ण जिल्ह्याला व्हावी हा यामागचा हेतू !



संकलक -
पत्रकार गणेश जेवरे (कर्जत)
जिल्हा उपाध्यक्ष,मराठी पत्रकार संघ

# सरदार महादजी शिंदे यांचा वाडा, जामगांव, ता. पारनेर

अहमदनगर जिल्हयातील पारनेर तालुक्यातील जामगाव येथे इतिहासप्रसिध्द सरदार महादजी शिंदे यांचा एक अप्रतिम वाडा आहे. हा वाडा पूर्वाभिमुख असून वाडयाचे मुख्य! प्रवेशद्वार व त्याची औरस-चौरा तटबंदी पाहिल्यावर आपणास वाडयाचे अंतः स्वरुप किती भव्य असेल, हे लक्षात येते. वाडयासमोर असलेले श्री हनुमंताचे मंदीर व त्यातील वाडयाकडे आपली कपानजर ठेवणारे सुरेख हनुमंताचे रुप पाहुन आपण त्याच्यापुढे नतमस्तक होतो. पाठ फिरुवून पंचवीस मीटरवरील असलेल्या दरवाजातून आपण आत प्रवेश करतो.

पुढे २० मीटरवर उजव्या बाजूस पूर्ण दगडीकाम असलेली चौकी लागते. तिच्या समोर व बाजूला पूर्वी वसलेल्या गावाच्या घरांचे अवशेष दिसतात. डाव्या बाजूस गजबजलेल्या घरांच्या अवशेषांतच टिकून राहिलेले उत्तम स्थितीतील पूर्ण दगडीकाम असलेले प्रभू श्रीरामचंद्राचे मंदिर व त्यासमोर विठठलाचे छोटे मंदिर आपल्या मनास आनंद देऊन जाते. गजबजलेल्या वस्तीच्या थोडेसे दूर विठ्ठल-रखुमाईचे मंदिर सरदार महादजी शिंदे यांच्या विठठलभक्तीची साक्ष देते. जामगावच्या जुन्या घरांच्या दगडधोंड्यांतून बाहेर पडताच आपणास समोर पुन्हा भक्कम बुरुजयुक्त तटबंदी व भव्य प्रवेशद्वार दिसते. प्रवेशद्वारवर सरदार शिंदे घराण्याचे नागांचे कोरलेले राजचिन्ह त्याच्या पराक्रमाची आठवण करुन देते. प्रवेशद्वारातून पुढे सरकल्यावर ४ फूट उंचीच्या चिरेबंदी जोत्यांच्या मध्ये असलेल्या सात लांब-रुंद पाय-या वर चढून गेल्यावर १०० मीटरवरील महाकाय मुख्य वाडा आपल्या नजरेच्या टप्प्यात येतो. ६८ मीटर बाय ४० मीटर आकाराचा भव्य दोन चौकी, तीन मजली वाडा पाहून आपण थक्क होतो. येथील प्रवेशद्वारावर नागांचे राजचिन्ह दिसते. आत प्रवेश केल्यावर पहिला चौक दिसतो. मधे कारंजाची अष्टकोनी कुंडी व चारही सोपे आपले जुने रुप टिकवून खंबीरपणे उभे दिसतात. प्रवेशद्वाराच्या उजव्या बाजूच्या २० मीटर बाय ७ मीटर अशा भव्य सोन्याचे खांबात व तुळया आजही उत्तम स्थितीत असून त्यांना जोडणा-या नक्षीदार बॅकेटसमुळे आपला सुबकपणा, आणि सरदार शिंदे यांची सौंदर्यदृष्टी सांभाळून खडे आहेत. त्यातच महादेवाचे मंदिर आपणास सरदार शिंदे यांच्या धार्मिकतेचे दर्शन घडवते. चारही सोपे असेच भक्कम असून त्यांच्यावर मजला आहे. मजल्यावरील सोप्यात आपण भिंतीतील जिन्यातून जाऊ शकतो. सर्व लाकूडकाम सुदंर नक्षीकाम केलेले असून हे काम करणारे सुतार अत्यंत कसबी असावेत, असे वाटते. बहुधा हे कलावंत माळव्यातून आले असावेत. एक वैशिष्ट्य असे की, या सर्व लाकडी खांबात एक पुर्ण अखंड दगडी आहे. त्याचे कोडे उलगडत नाही.

वाडयातील मच्छीमहाल, रंगमहाल, आंबे महाल यांतील नक्षीकाम, विशेषतः तक्तपोशीवरील बारीक, सुबक, नाजुक, प्रमाणध्द नक्षीकाम पाहून कारागीरांच्या कौतुकास शब्द अपुरे पडतील. वाडयात असलेले पीराचे देवस्थान हे तत्कालीन हिंदू-मुस्लीम ऐक्याचे प्रतीक तर नसावे. संपूर्ण एका सोप्यात मुदपाकखाना पहिल्यावर सरदार शिंदे यांच्या पक्कान्नांचा तेथे जणू घमघमाट सुटल्यासारखे क्षणभर वाटते. भिंतीतील पाणी साठविण्याचे हौदभिंतीतूनच वरपर्यंत धूर पोचवणारे धुराडे पाहिल्यावर या स्वयंपाकघराचे भव्यपण आणि पसारा लक्षात येतो. ४२ फुट असा पाटा पाहून त्यावर वाटल्या जाणा-या मसाल्याची लज्जत कशी असेल अशी कल्पना मनात तरळते वरच्या मजल्यावरुन जिन्याने टेरेसवर गेल्यावर मागे टेकडीवरील निसर्गसौंदर्य न्याहाळता येते. टेकडीच्या उतारावरच वाडा असल्यामुळे त्याचे स्थापत्य विशिष्ट प्रकाराचे असावे, हे ध्यानात येते. त्याचे संशोधन व अभ्यास एखादा संशोधक स्थापीतच करु शकेल. संपूर्ण वाडा फिरुन बघण्यास साधारणपणे दोन ते अडीच तास लागतात. वाडयात सध्या असलेले रयत शिक्षण संस्थेचे डी. एड. कॉलेजचे वर्ग व वसतिगृह पाहून बरे वाटते. तसेच नव्याने कृषी कॉलेज सुरू केलेले आहे.

वाडा पाहून बाहेर आल्यावर मुख्य दरवाजाच्या शेजारी असलेल्या परंतु सध्या बंद केलेल्या दरवाजासमोर उभे राहिले की समोरील हनुमंताचे दर्शन घडते. दरवाजा ते हनुमानमंदिर हे अंतर सुमारे ८०० मीटर असावे. शिंदे सरकार रोज हनुमानाचे दर्शन घेत असावेत.
वाडयाच्या बाहेरच एक घडीव दगडातून बांधलेली बारव दिसते. तिच्या पाय-यांच्या समोर असलेली, सुबक बांधकाम केलेली कमान आपले लक्ष वेधून घेते. सभोवार नजर टाकल्यावर पूर्वेकडे नगरवेस, दक्षिणकडे पारनेर वेस, उत्तरेस डिक्सळवेस या वेशी आपले भव्य स्वरुप सांभाळून, तटबंदी व बुरुज यांसह निश्चित पणे उभ्या आहेत, असे वाटते. उजव्या बाजूस घोडयाच्या पागेची जागा इमारतीचे अवशेष दाखविते. वाडयात एक तळघर असल्याचेही सांगितले जाते. वाडयाच्या बाहेरील तटबंदीच्या आत एकूण ८६ एकर क्षेत्र आहे. यात वाडा व संपूर्ण जामगावचे

अवशेष आहेत. वाडयाला एकूण ११ बुरुज व ६ प्रवेशद्वारे आहेत. असा हा भव्य वाडा मराठी माणसांनी अवश्य पाहावा.

**ऐतिहासिक वास्तुरंग-**

सरदार राणोजी शिंदे हे थोरले बाजीराव पेशव्यांचे अत्यंत विशासू साथीदार होते. त्यांचे मूळ गाव कण्हेरखेड, ता. कोरेगाव, जि. सातारा. त्यांना ५ पुत्र, १) जयाप्पा, २) दत्ताजी, ३) ज्योतिबा, ४) तुकोजी, व ५)महादजी असे जणू पाच पांडवच. हे सर्व पराक्रमी निपजले. दत्ताजी यास पेशव्यांनी अहमदनगरचा किल्ला घेण्यास पाठविले. ते व जनकोजी जियाप्पांचे पुत्र १७६१ च्या पानिपतच्या संग्रामात धारातीर्थी पडले. महादजी हे या घराण्यातील सर्वात कर्तबगार आणि बुध्दिमान, समरधुरंधर असे पुरुष होऊन गेले. लढाईवर असताना देखील शिवलिंगाच्या कोंबडीच्या अंडयाच्या आकाराएवढ्या पाचूमध्ये कोरलेले बरोबर असे महादाजीचे परमेश्वराच्या सेवेसाठी सदैव सिध्द हे विरुद होते. त्यांनी कार्यासाठी फौज उभी केली. सत्ता हिंदवी स्वराज्यात आणण्याचे श्रेय त्यांचच संपूर्ण उत्तर हिंदुस्थानात मराठी सत्ता निर्माण करणारे, छ. शिवाजीमहाराजांचे हे स्वप्न साकार करणारे, महादजी शिंदे म्हणजे मर्दुमकीला महामेरुचा इंग्रज लोक लंडनला हिंदुस्तानातील राजकीय परिस्थितीचा अहवाल सादर करताना नकाशाव्दारे कळवीत. त्यात राजस्थानच्या वाळवंटापासून ते बंगालच्या उपसागरापर्यंतचा प्रदेश म्हणजे मराठा साम्राज्य असे दाखवीत. हिंदुस्थानचा बादशहा कोण असावा ते महादाजी ठरवीत. त्यांनी रजपुतांना पराभूत केले तसेच आपलेच होळकर यांनासुध्दा त्याच्यापुढे पराभव पत्करावा लागला. आधुनिक सुसज शस्त्रास्त्रांनी परिपूर्ण असलेल्या इंग्रजांना त्यांनी एकदा खडे चारले व दुस-यादा तहास भाग पाडले. मुघल बादशहा शाह आलम हा महादजींचे आश्रित झाला. दिल्लीभोवतलाचा १०० मैलांचा प्रदेश महादजींच्या खाजगी जहागिरीत आला. जवळजवळ २१ वर्षे महादजी हे हिंदुस्थानचे प्रशासक होते. तरीसुध्दा त्यांनी मराठेशाहीशी इमान राखले. पुणे आणि दिल्लीच्या मध्यावरील उज्जैन या ठिकाणी त्यांनी वास्तव्य केले. या क्षेत्रीय गोपाळकृष्णांचे शिक्षण झालेला सांदिपनी ऋषीचा आश्रम शिप्रा नदीच्या तीरावर आहे. कवी कुलगुरु कालिदास याने आपली महाकांव्य या ठिकाणीच रचली. अशा पवित्र नगरीत महादजींनी राजवाडा बांधला. अनेक मंदिरांचे जीर्णोध्दार केले. नगरीचे सांस्कृतीक वैभव अत्युच्च पदावर नेले. त्यांना वकील-ए-मुतलक, बक्षी उल मामलिक, अमीर उल उमरा अलिजा बहादूर अशा पदव्या होत्या. देवापाशी केलेले मागणे वाया जात नाही. असा ठाम विश्वास बाळगणारा, परेमश्वराच्या आराधनेत तासनतास रमणारा अनेक मंदिरे व घाट उभे करणारा महाराष्ट्राचा महादेव असा हा महापुरुष या देशास ललामभूत झाला. त्यांनी रचलेल्या अनेक आरत्या आजही ग्वाल्हेरमधील मंदिरामध्ये म्हटल्या जातात. त्यांचे आपण सध्या जे चित्र पाहतो ते जेम्स वेल्स या इंग्रज चित्रकाराने सन १७९२ ला काढले आहे. सन १७९४ साली पुण्यात महादजींचे निधन झाले. वानवडी येथे त्यांची छत्री त्यांच्या महापराक्रमाची व अध्यात्मवृत्तीची संपूर्ण हिंदुस्थानास आठवण करुन देत दिमाखाने उभी आहे. म्हणून म्हणतो की, महादजीच्या नंतर दौलतराव हे दत्तकपुत्र वारसदार झाले. त्यांनी ग्वाल्हेर येथे राजधानी केली. त्यानंतर जयाजीराव हे दत्तकपुत्र ग्वाल्हेर संस्थानाचे अधिपती झाले. १८६३ साली त्यानी शिक्षणखाते संस्थानात स्थापन केले. त्यानंतर माधवराव हे अधिपती झाले. त्यांनी ग्वाल्हेर लाईट रेल्वे सुरु केली, महाविदयालय काढले, ६६ माध्यमिक शाळा, ७२७ प्राथमिक शाळा तसेच लष्करी शिक्षण व इंजिनियरिंग शिक्षण इत्यादी गोष्टी संस्थानात सुरु केल्या. त्यानंतर जिवाजीराव शिंदे यांनी ग्वाल्हेर येथे विक्रम विदयापीठ, माधव इंजिनिअरिंग कॉलेज, जिवाजी विदयापीठ स्थापन केले. त्यांनीच जामगाव येथील वाडा रयत शिक्षण संस्थेला १९५५ साली बक्षीस दिला. २ मे १९५६ रोजी त्यांनी स्वखर्चाने बक्षीसपत्र करुन दिले. वाडयाच्या तटबंदीच्या बाहेरील ४६८ एकर जमीन त्यातील आंबा व चिंच या झाडांच्या मोतीबाग, जुनाबाग, नळबाग, हिराबाग व बारा मोटा हाकता येणारी विहीर भोम यांसह बक्षीस दिली. सध्या या वाडयात रयत शिक्षण संस्थेचे महाराजा माधवराव शिंदे अध्यापक विदयालय वसतिगृहासह नव्याने कृषी विद्यालय चालू आहे.

जिवाजीराव शिंदे यांच्या पत्नी कै.विजयाराजे शिंदे या होत. त्यांचेच सुपुत्र कै. माधवराव शिंदे केंद्रीय मंत्री व कन्या वसुंधरा राजे राजस्थानच्या माजी मुख्यमंत्री माधवरावांचे सुपुत्र मा. ज्योतिरादित्य शिंदे हे सध्या केंद्रीय मंत्रिमंडाळात आहेत.




संकलक-ज्ञानदेव दत्तात्रय पांडुळे
जनरल बॉडी सदस्य, रयत शिक्षण सातारा,
मो. ९४२२२२०२००





## ठेवीचे व्याज दर (द.सा.द.शे.)

- १ वर्षाच्या पुढे ९.५०%
- १८१ दिवस ते ३६५ दिवस ९.०%
- ९१ दिवस ते १८० दिवस ८.५०%
- ४६ दिवस ते ९० दिवस ८.००%

## सेव्हिंग्ज खाते सुरु करा आणि मिळवा ७% व्याज

* **लाभांश वाटपाबाबत -** ज्या सभासदांनी पतसंस्थेमध्ये सेव्हिंग्ज खाते उघडले आहे, त्यांचा मागील लाभांश सभासदांच्या सेव्हिंग्ज खात्यात वर्ग करण्यात आलेला आहे. ज्या सभासदांनी सेव्हिंग्ज खाते उघडलेले नसेल, त्यांनी सेव्हिंग्ज खाते उघडावे. म्हणजे लाभांशाची रक्कम त्यांच्या सेव्हिंग्ज खात्यात वर्ग करणे शक्य होईल.



## GOLDEN FRIDAY SAVINGS

दैनंदिन शिल्लक रकमेवर ७% व्याज मिळवा...

तुमचे सर्वोत्तम हित जोपासण्यासाठी
आजच गुंतवणूक करा आणि
On Call Deposit वर ७ दिवसांत ७% व
१५ दिवसांत ८% व्याजदर मिळवा.



## विविध कर्ज योजना

- वैयक्तिक कर्ज - १५.००%
- कॅश क्रेडिट कर्ज - १३.००%
- व्यावसायिक कर्ज - १३.००%
- पर्यटन कर्ज १०.००%
- स्थावर तारण कर्ज - १३.००%
- शैक्षणिक कर्ज १०.००%

## जिजाऊ लखपती ठेव योजना



दरमहा १४००/- रुपये भरा
६० महिन्यांनंतर
**१ लाख रुपये मिळवा.**

## शहाजीराजे दामदुप्पट ठेव योजना



८४ महिने ठराविक रकमेची ठेव ठेवा
आणि **८४ महिन्यांनंतर**
**दुप्पट रक्कम मिळवा.**

## शंभुराजे चिरंजीव लखपती ठेव योजना

दरमहा १०००/- रुपये भरा
७५ महिन्यांनंतर
**१ लाख रुपये मिळवा.**



ज्येष्ठ नागरिकांना लाभो
**आरोग्यदायी फळ**
आमच्या मुदत ठेव योजनेद्वारे मिळो
**उच्च प्रतिफळ**

★★★★★

## ज्येष्ठ नागरिक ठेव योजना

* १२ महिन्यांच्या मुदत ठेवीवर
**१०%**
* दरमहा व्याज सुविधा



महिलांनो, भविष्यासाठी सक्षम व्हा..
आपले जीवन अधिक सुरक्षित करा..
**महिलांसाठी विशेष योजना !**

## जिजाऊ ठेव योजना

★★★★★

१ वर्षाच्या मुदत ठेवीवर
**१०% व्याजदर**
आमच्या जवळच्या शाखेशी संपर्क साधा.





सोने तारण कर्ज
**१० %**
(नियम व अटी लागू)*

**कमीत कमी व्याजदरात**
**सोने तारण कर्ज सुविधा**




मराठा सेवा संघ प्रणीत

# अहमदनगर जिल्हा मराठा सेवा नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, अहमदनगर

## ※ शाखा ※

- माळीवाडा - मराठा सांस्कृतिक भवन, जिजाऊ मार्ग, बारातोटी कारंजा, माळीवाडा, अहमदनगर फो.(०२४१) २३५४९०७
- मार्केटयार्ड अहमदनगर - छत्रपती शिवाजी महाराज संकुल, कोठी रोड, मार्केटयार्ड, अहमदनगर फोन (०२४१) २४५२५७३
- भिंगार, अहमदनगर - ब्राम्हण गल्ली, भिंगार, अहमदनगर फोन (०२४१) २४४१०५१
- नेवासा - ज्ञानेश्वर महाविद्यालया समोर, नेवासा फाटा, अहमदनगर मो. ९०२१०७००८०
- संगमनेर - विठ्ठल स्मृती कॉम्प्लेक्स्, टेलिफोन ऑफिस शेजारी, अकोले रोड, सावतामाळी नगर, संगमनेर (०२४२५) २२०७९१
- पाथर्डी - बालाजी टॉवर, गुंजन साडी सेंटर शेजारी, शेवगांव रोड, पाथर्डी, अ.नगर मो. ९९२३४०११३३/ ८८३०२१२२२४
- शेवगाव - शंभुतिर्थ, ढमाळ कॉम्पलेक्स, मिरी रोड, शेवगांव, ता.शेवगाव,जि.अ.नगर. फोन नं ९७३०७७३९३३.
- कर्जत - युनियन बँकेच्या समोर, बाजार तळ, कर्जत, अहमदनगर मो. ९४२१४७८९८८

## संस्थेची वैशिष्ट्ये

※ अहमदनगर जिल्हा कार्यक्षेत्र ※ शहराचे मध्यवर्ती ठिकाणी मुख्य कार्यालय

※ स्वभांडवलावर कर्ज वितरण ※ प्रशिक्षित सेवक वर्ग

※ विनम्र व तत्पर सेवा ※ संपूर्ण संगणकीकृत व पारदर्शक कामकाज

※ कार्यक्षम तज्ज्ञ संचालक मंडळ व ग्राहकाभिमुख योजनेतून गतिमान कामकाज

※ आर.टी.जी.एस.व एन.ई.एफ.टी.सुविधा उपलब्ध

※ ठेवीवर सर्वाधिक व्याज.

**सामाजिक उपक्रम : ※ महापुरुषांचे जयंती उत्सव ※ गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव ※ सभासदांना वैद्यकीय मदत ※ सामाजिक गौरव समारंभाचे आयोजन ※ २५०० पेक्षा जास्त युवकांना उद्योगधंद्यासाठी अर्थसाह्य**

**कार्यालयीन वेळ - सोमवार ते शनिवार सकाळी १०.३० ते सायंकाळी ५.३०**
**साप्ताहिक सुट्टी रविवार - २ रा व ४ था शनिवार बंद.**

**- कॅश व्यवहार वेळ -**
**सकाळी ११.०० ते दुपारी ३.३०**